सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. २६ मार्च २०२५ वर्ष दुसरे अंक ३५९ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आदित्य सोबत दिशा सालियन प्रकरणात उद्धव ठाकरेही आरोपी
## सतीश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांचा गंभीर आरोप

मुंबई : दिशा सालियनचा मृत्यू पाच वर्षांपूर्वी ८ जून २०२० रोजी झाला होता. पण ही आत्महत्या होती की हत्या होती, यावरून वाद सुरू आहे. मध्यल्या काळात एसआयटी मार्फत तपास करण्यात आला. तरीही आरोप सुरूच होते. आता याप्रकरणात दिशाचे वडील सतीश सालियन यांनी तिच्यावर सामूहिक अत्याचार करुन खून केल्याची याचिका हायकोर्टात दाखल केली आहे. या प्रकरणावर बोलताना सतीश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांनी गंभीर आरोप केले आहेत. आदित्य ठाकरे खोटे बोलत आहे. आदित्य ठाकरेंचे गुन्हे लपवण्यासाठी उद्धव ठाकरेंनी पदाचा वापर केला आहे. दिशा सालियन प्रकरणात उद्धव ठाकरेही आरोपी आहे. आमच्याकडे प्रत्यक्षदर्शी पुरावे आहेत. फक्त सुरक्षेच्या कारणास्तव प्रत्यक्षदर्शींचे नाव सांगत नाही, असा गंभीर आरोप या प्रकरणात निलेश ओझा यांनी केला आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा वातावरण तापण्याची शक्यता आहे. विरोधकांकडून या प्रकरणात शिवसेना ठाकरे गटाची कोंडी करण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

दिशा सालियन प्रकरणात तिचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई हाय कोर्टात याचिका दाखल केली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा पाच वर्षांनी हे प्रकरण चर्चेमध्ये आलं आहे. या प्रकरणात त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर देखील आरोप केले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा राज्यातील वातावरण तापलं असून, आरोप-प्रत्यारोपाला सुरुवात झाली आहे.

आज दिशा सालियनचे वडील सतीश सालिय यांनी मुंबईच्या अतिरिक्त पोलीस आयुक्तांची भेट घेतली. त्यांच्याशी चर्चा केली. दरम्यान भेटीनंतर परतत असताना प्रसारमाध्यमांनी त्यांची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी प्रसारमाध्यमांना कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. 'मला चक्कर येत आहे, एवढंच ते यावेळी बोलले. एसआयटीने स्टेटमेंट घेतले होते, असेही ते यावेळी म्हणाले.

परमबीर सिंग, सचिन वाझेलाही आरोपी करण्याची मागणी



दरम्यान, यावेळी त्यांनी नेमकी काय मागणी केली याबाबत सतीश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांनी माहिती दिली. 'दिशाचे वडील सतीश सालियान यांनी अतिरिक्त पोलीस आयुक्तांची भेट घेतली. आदित्य ठाकरेंसह इतरांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे. परमबीर सिंग, सचिन वाझेलाही आरोपी करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली आहे, असे ओझा यांनी यावेळी म्हटले.

दिशा सालियन प्रकरणात उद्धव ठाकरे पण आरोपी

दिशा सालियन प्रकरणात उद्धव ठाकरे पण आरोपी आहेत. आदित्य ठाकरेंकडून घडलेल्या गुन्ह्यावर पांघरुन घालण्यासाठी उद्धव ठाकरेंनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचा दुरुपयोग केला. त्यावेळी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते. त्यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केला, असा आरोप ओझा यांनी केला. 'सचिन वाझे त्यांच्याच (ठाकरेंच्या) गँगचे होते. वाझेला ख्वाजा युनिसच्या कस्टडी मर्डर प्रकरणात हायकोर्टानं तुरुंगात पाठवलं आणि त्याचं निलंबन केलं होतं. तो १६ वर्षे निलंबित होता. ठाकरे मुख्यमंत्री होताच त्याला सेवेत घेण्यात आलं आणि थेट क्राईम इन्टेलिजन्स युनिटमध्ये पाठवण्यात आलं. सचिन वाझेची पाठराखण करायला उद्धव ठाकरे समोर आले होते. सचिन वाझे काय ओसामा बिन लादेन आहे का, विचारत होते,' याची आठवण ओझा यांनी केली.

आरोपींना अटक करण्याची जबाबदारी आता पोलिसांची

'आरोपींना अटक करण्याची जबाबदारी आता पोलिसांची आहे. आदित्य ठाकरे, दिनो मोरिया, सूरज पांचोली, त्यांचे अंगरक्षक, परमवीर सिंह, सचिन वाझे, रिया चक्रवर्ती हे सगळे यात आरोपी आहेत. या सगळ्यावर पांघरुण घालण्याचं, हे प्रकरण दडपण्याचं काम तेव्हा पोलीस आयुक्त असलेल्या परमबीर सिंह यांनी केलं. या प्रकरणात आदित्य ठाकरेंचं नाव आल्यावर त्यांनी कव्हर अप करण्यासाठी पत्रकार परिषद घेतली आणि वेगळीच कहाणी सांगितली. आम्ही सीसीटीव्ही तपासले. त्या फ्लॅटवर कोणताही राजकीय नेता आलेला नव्हता, असं त्यांनी सांगितलं. पण मोबाईल टॉवरच्या लोकेशनपासून प्रत्यक्षदर्शींच्या साक्षींपर्यंत सगळ्यात त्यांचा दावा खोटा ठरला आहे.

आमच्याकडे भरपूर प्रत्यक्षदर्शी

'आमच्याकडे भरपूर प्रत्यक्षदर्शी आहेत. आम्हाला दोनच गोष्टी सिद्ध करायच्या आहेत. दिशाची हत्या झाली तेव्हा आदित्य ठाकरे तिथे होते की नाही आणि दिशाचा मृत्यू हा नैसर्गिक नसून त्यात घातपात आहे. त्यानंतर आरोपीची जबाबदारी आहे की त्यानं स्पष्टीकरण द्यायचं की मृत्यू कसा झाला आणि मी तिथे होतो की नव्हतो. आदित्य ठाकरेंनी असा युक्तिवाद केला की त्या दिवशी माझे आजोबा वारले होते आणि या प्रकरणातील दुसऱ्या आरोपीला मी ओळखत नाही. ते दोन्ही युक्तिवाद खोटे निघाले. मोबाईल टॉवर लोकेशनवरुन पण खोटे निघाले. त्यांचे आजोबाही त्यावेळी जिवंत होते. अशा परिस्थितीत खोटा युक्तिवादच आरोपीला फाशीची शिक्षा देण्यासाठी सबळ पुरावा आहे, असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे,' असं वकील ओझा यांनी सांगितले.

# प्रशांत कोरटकरला ३ दिवसांची पोलीस कोठडी

कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या प्रकरणात पोलिसांनी प्रशांत कोरटकरला काल (२४ मार्च) तेलंगणातून अटक केली. आज (२५ मार्च) त्याला कोल्हापूरच्या सत्र न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

यावेळी प्रशांत कोरटकरच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचे दाखले देत अटकेवर आक्षेप घेतला. पोलिसांनी चौकशीसाठी सात दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती, मात्र न्यायालयाने ती नाकारत तीन दिवसांचीच कोठडी मंजूर केली.

प्रशांत कोरटकरच्या वकिलांनी युक्तिवाद करताना, तो तपासात सहकार्य करत असल्याचे आधीच सांगितले असताना अटक करण्याची गरज नव्हती, असा मुद्दा मांडला. तसेच, त्याच्यावर लावण्यात आलेल्या कलमांनुसार सात वर्षांपर्यंतची शिक्षा होऊ शकते, मग अटकेची गरज काय? असा सवाल उपस्थित केला. यावर सरकारी वकिलांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊनच अटकेची कारवाई करण्यात आल्याचे स्पष्ट केले. सरकारी वकिलांनी न्यायालयात सांगितले की, प्रशांत कोरटकरच्या विधानांमुळे मोठे तणाव निर्माण झाले आहेत आणि त्याचे व्हॉइस सॅम्पल घेण्याची गरज आहे. तसेच, त्याने स्वतःहून मोबाईल जमा न करता त्यातील डेटा डिलीट केल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली. तो महिनाभर फरार होता, त्यामुळे अधिक चौकशीसाठी पोलीस कोठडी आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले.

वकील असिम सरोदे यांनी नमूद केले की, आवाजाचे नमुने वैज्ञानिक पद्धतीने घेतले जातात आणि त्यामध्ये स्वर व व्यंजन महत्त्वाचे असतात. आरोपीचा आवाज बदलला जाण्याची शक्यता असल्यामुळे वेगवेगळ्या वेळी त्याची जबानी घेणे गरजेचे आहे. या प्रकरणी कोल्हापूर न्यायालयात सुनावणी सुरू असताना शिवप्रेमी आक्रमक झाल्याचे चित्र दिसून आले. सुनावणीनंतर प्रशांत कोरटकरला कोर्टाबाहेर आणले असता एका शिवप्रेमीने त्याला चप्पल दाखवण्याचा प्रयत्न केला. तसेच, न्यायालयात हजर करण्यापूर्वीही परिसरात मोठ्या प्रमाणात शिवप्रेमी उपस्थित होते. एका व्यक्तीने हातात कोल्हापूरी चप्पल घेत हे ९ नंबरचे पायताण बरोबर प्रशांत कोरटकरच्या गालावर उठवायचे आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया दिली.

# 'इंडी' आघाडीने सोरोसचा पैसा निवडणुकीत वापरला



लखनऊ : विरोधकांच्या इंडी आघाडीने लोकसभा निवडणुकीत हस्तक्षेप करण्यासाठी जॉर्ज सोरोसचा परदेशी पैसा वापरला. त्या पैशातून भाजपच्या विरोधात खोटा प्रचार केल्याचा घणाघाती आरोप उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज, मंगळवारी एका मुलाखतीत केला.

यावेळी योग आदित्यनाथ म्हणाले की, कर्नाटकात काँग्रेस सरकारने धर्माच्या आधारावर मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण दिले आहे. अशाप्रकारे नियमबाह्य धर्माच्या आधारे आरक्षण देणे हा बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेचा अपमान आहे, पण आज कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार जे बोलत आहेत, ते काँग्रेसकडून त्यांना मिळालेल्या राजकीय वारशातूनच बोलत असल्याचा टोला योगी आदित्यनाथ यांनी लगावला.

लोकसभा निवडणुकीमध्ये उत्तर प्रदेशात भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. कारण भाजप विरुद्ध विरोधकांनी अपप्रचार केला होता. खोटा नॅरेटिव्ह चालवला होती. इंडि आघाडीने जॉर्ज सोरोसचा पैसा लोकसभा निवडणुकीत वापरला. त्यातून भाजप सरकार विरुद्ध अपप्रचार केला. विदेशी शक्तींना भारतामध्ये भाजपचे सरकार नको होते. जॉर्ज सोरोस यांनी तसे पूर्वीच जाहीर केले होते. त्यामुळे त्यांनी इंडि आघाडीला भरपूर पैसा पुरवून लोकसभा निवडणुकीत हस्तक्षेप केला होता. इंडि आघाडीने त्यांचा पैसा वापरून देशद्रोह केला, असा घणाघाती आरोपही योगी आदित्यनाथ यांनी केला. प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यानंतर योगी आदित्यनाथ प्रथमच जाहीरपणे विदेशी हस्तक्षेपाबद्दल बोलले, त्यामुळे त्यांच्या वक्तव्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

दरम्यान, काही लोक देशात दुफळी माजवायला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर करतात. ते अभिव्यक्ती स्वातंत्र्याला फक्त स्वतःचा जन्मसिद्ध अधिकार मानून इतरांचा अपमान करतात. पण आता देशातील जनता असले खोटे बोलणारे अभिव्यक्ती स्वातंत्र्य मानायला तयार नाही, असा टोला योगी आदित्यनाथ यांनी कुणाचे नाव न घेता लगावला.

# 'या' मोबाईल नंबरचे UPI अकाऊंट एक एप्रिलपासून बंद होणार

मुंबई : नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अर्थात एनपीसीआयचे नवे निर्देश एक एप्रिल २०२५ पासून लागू होणार आहेत. हे निर्देश लागू झाल्यानंतर बँका आणि यूपीआय ॲप इनॲक्टिव्ह असलेले मोबाईल त्यांच्या यंत्रणेतून काढून टाकणार आहेत. जे मोबाईल नंबर काढून टाकले जातील त्या नंबरांचा वापर करुन नंतर कधीही कोणत्याही प्रकारचे ऑनलाईन व्यवहार करता येणार नाही. काढून टाकलेल्या नंबरांचा वापर मोबाईल वॉलेट आणि यूपीआय व्यवहारांसाठीही करता येणार नाही. या प्रक्रियेत फक्त जे मोबाईल नंबर इनॲक्टिव्ह असतील, तेच काढून टाकण्यात येणार आहेत.

इनॲक्टिव्ह मोबाईल नंबर म्हणजे रिचार्ज संपल्यानंतर पुढील ९० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त काळ रिचार्ज न केल्यामुळे बंद झालेले मोबाईल नंबर. हे इनॲक्टिव्ह मोबाईल नंबर ॲक्टिव्हेट करता येतील की नाही याची अधिकृत माहिती संबंधित मोबाईल नंबरचे सर्व्हिस प्रोव्हायडर अर्थात सेवा प्रदाता देऊ शकतात. यामुळे आपला नंबर इनॲक्टिव्ह झाला आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी संबंधित नंबरच्या सर्व्हिस प्रोव्हायडरशी अथवा संबंधित नंबर ज्या कंपनीचा आहे त्यांच्या गॅलरीशी संपर्क साधणे हिताचे आहे.




# कचऱ्याच्या ढिगाऱ्यात सापडली ६ ते ७ अर्भकं आणि मानवी अवशेष

पुणे : पुण्यातील दौंड शहरात असणाऱ्या कचऱ्याच्या ढिगार्यात अर्भक आणि मानवी शरीराचे काही अवशेष आढळून आल्याची माहिती समोर आली आहे.यामुळे तेथील परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दौंड शहरालगत असणाऱ्या बोरावके नगरमध्ये प्राईम टाऊनच्या पाठीमागे असणाऱ्या कचऱ्याच्या ढिगार्यात अर्भक आणि मानवी शरीराचे काही अवशेष आढळून आले. स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी पोलिसांच्या ११२ क्रमांकाला फोन करून या संदर्भातील माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच दौंड पोलीस घटनास्थळी दाखल झाले.त्यानंतर पोलिसांनी पाहणी अंती पंचनामा करून डॉक्टरांचे वैद्यकीय पथक देखील या ठिकाणी बोलावले. हे अर्भक आणि अवशेष ताब्यात घेण्यात आले असून हे या ठिकाणी कसे आले याचा शोध आता दौंड पोलीस करत आहेत. हे अर्भक आणि काही मानवी शरीराचे अवशेष सीलबंद बरण्यांमध्ये ठेवली असून त्यावरती त्या संदर्भातील माहिती देखील आहे आणि ते २०२० मधील आहेत अशी प्राथमिक माहिती आता समोर आली आहे. मात्र, या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात हे अर्भक आणि मानवी शरीराचे अवशेष कसे आले याचा शोध दौंड पोलीस घेत आहेत.हा गर्भपाताचा प्रकार आहे का या दृष्टीने देखील दौंड पोलीस सध्या तपास करत आहेत.




# निमखेडी बसस्थानक जवळ एकाचा मृत्यू



सोयगाव,दि.२५ मार्च : तालुक्यातील निमखेडी बसस्थानका जवळ एका पुरुषाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी आठ वाजता उघडकीस आली. त्यामुळे सोयगाव तालुक्यात खळबळ उडाली आहे.दरम्यान घटनास्थळी सोयगाव पोलीसांनी पंचनामा केला असून सोयगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पिंपळगाव(हरे) ता.पाचोरा जि.जळगाव येथील रहिवासी अमोल दामोदर बावस्कर (वय.२५) हे निमखेडी बस थांब्या वर सोमवारी दुपारी तीन वाजेपासून बसलेले होते. असल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले दरम्यान सोमवारी रात्री ते निमखेडी बस थांब्या वरच झोपले असता त्यांचा झोपेत च मृत्यू झाला आहे.रात्री त्यांचा मृत्यू झाला दरम्यान मंगळवारी पहाटे आठ वाजता त्यांचा मृतदेह आढळून आला घटनास्थळी सोयगाव बीड जमादार राजू बर्डे,रविंद्र तायडे,अजय कोळी आदींनी धाव घेत घटनेचा पंचनामा केला असून सोयगाव ग्रामीण रुग्णालयात त्याचेवर शवविच्छेदन करण्यात आले. पुढील तपास पोलीस करीत आहे.



CMYK

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ मार्च -**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या करियरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रभर विविध महाविद्यालयात करियर कट्टा हा उपक्रम राबविला जातो. यंदा लातूरच्या जयक्रांती महाविद्यालयात

हा उपक्रम अतिशय पद्धतशीरपणे राबविल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे यांना स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड येथे जिल्हास्तरीय उत्कृष्ट प्राचार्य या पुरस्काराने प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा शारदाभुवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी.पी. सावंत होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, प्रमुख पाहूणे म्हणून तर तसेच प्रा.डॉ. किरण कुमार बोदर, कुलसचिव डॉ.डि.डि. पवार, महाराष्ट्र माहिती साह्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, प्राचार्य बाळासाहेब जाधव व प्रा.डॉ. सतिश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### सुभान्या सायंटिस्ट चित्रपट चित्रीकरणाचा शुभारंभ

**अहमदपूर, दि.२५ मार्च -**

अहमदपूर पासून जवळच शिरूर राजबंद येथील प्रसिद्ध अशा भगवान बालाजी मंदिरात नांदेड येथील श्रीनिवासा प्रोडक्शन निर्मिती 'सुभान्या सायंटिस्ट' या मराठी चित्रपटांचा मुहूर्त बालाजी मंदिर देवस्थान चे दत्ता जवळगे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी चित्रपटाची निर्माती दिपाली देशमाने, दिग्दर्शक दिलीप आंबेकर, कॅमेरामन विकी लकीरी, कलाकार शिवम देशमुख, आकाश पाटील, मनाली कदम, दिलीप आंबेकर, रवी शिंदे, नितीन दरोडे, मनीषा मोठे गावकर, विनोद एडके, सस्मित गडकर, बालाजी पडोळे, शिवाजी श्रीमंगले आधी उपस्थित होते. यावेळी सर्व कलावंतांचा सत्कार दत्ता जवळगे यांनी केला चित्रपटातील अभंग या गाण्यावर चित्रीकरण करण्यात आले. यामध्ये येथील बालाजी मंदिर भजन करी मंडळचे कलाकेरांनी सहभाग घेतला. पुढील चित्रपटाचे शूटिंग सातारा मुंबई येथे होणार आहे. चित्रपट सप्टेंबरमध्ये प्रदर्शित होणार आहे.



### वंध्यत्व निवारण कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर, दि.२५ मार्च -**

लातूर स्त्री रोग संघटनेच्या वतीने लातुरातील हॉटेल अरोमा येथे आयोजित करण्यात आलेल्या वंध्यत्व निवारण नवीन उपचार प्रणाली विषयावरील कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत डॉ. वसुधा जाजू, डॉ. भालचंद्र, डॉ. शोभराणी कर्पे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर अखिल भारतीय स्त्री रोग लॅप्रोस्कोपी संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. कल्याण बरमदे यांचा या कार्यशाळेत विशेष गौरव करण्यात आला. या कार्यशाळेत एकूण ९८ स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी डॉ. मंदाडे, डॉ. अनुजा कुलकर्णी, डॉ. वारद, डॉ. दीपक पाटील, डॉ. भुतडा, डॉ. लाड, डॉ. अनुसया वलसे, डॉ. दाताळ, डॉ. मस्के यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

### शेती पिकाच्या नुकसानीसाठी ई-केवायसी करुन घ्यावी

**लातूर, दि.२५ मार्च -**

लातूर जिल्हयात अतिवृष्टीने झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून ४६६ कोटी ४० लाख इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधी वाटपाची कार्यवाही डीबीटी प्रणालीमार्फत सुरु आहे. आजपर्यंत जिल्ह्यातील ३ लाख ८६ हजार ५०५ लाभार्थी मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले असून त्यापैकी ३ लाख ५० हजार ३७३ लाभार्थ्यांना ३८७ कोटी ३४ लाख रुपये निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच २४ हजार ३८२ शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी न केल्याने रक्कम २१ कोटी ७७ लाख रुपये इतका निधी वितरीत करणे शिल्लक आहे.

### हरुबाई सुमठाणे

**शिरूर अनंतपाळ, दि.२५ मार्च -**

येरोळ (ता. शिरूर अनंतपाळ) येथील प्रतिष्टीत महिला नागरिक हरूबाई नागनाथ सुमठाणे वय ८० यांचे अल्पशा आजाराने लातुर येथील रूग्नालयात उपचार चालु असताना सोमवारी दुपारी तीन वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन विवाहीत मुले सुना नातवंडे असा परिवार आह. पत्रकार राम सुमठाणे यांच्या आज्जी होत.

# पळसाच्या पानांची पत्रावळी झाली हद्दपार

**विवाह, सप्ताह, पूजेसाठी वापर झाला कमी...** **पत्रावळी बनवणारे हात बेरोजगार....**

**तभा वृत्तसेवा / शंकर मिटकर**
**शिरूर अनंतपाळ, दि.२५ मार्च -**

विवाह सोहळा, सप्ताह, पूजा व इतर मोठमोठ्या कार्यक्रमात जेवणासाठी मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या पळसाच्या पानांच्या पत्रावळी सध्याच्या काळात हद्दपार झाल्याचे चित्र शहरासह ग्रामीण भागातही सर्रास पहायवयास मिळत आहे.

त्याची जागा प्लास्टिक व थर्माकोलच्या पत्रावळींनी घेतली आहे. स्थानिकांचा पत्रावळी तयार करणे व पळसाची पाने जंगलातून आणून व्यापाऱ्यांना विकणे हा छोटेखानी रोजगार कमी झाला आहे.

तालुक्यात वृक्ष तोड राजरोसपणे सुरू आहे.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. परंतु वनविभागाच्या वतीने दरवर्षी अगनिक वृक्ष लागवड करण्यात येते.

त्याची आकडेवारी फार मोठी असते. परंतु लागवड झालेली झाडे वनविभागामार्फत किती जगवली जातात आणि जगली याची आकडेवारी उपलब्ध नसते. राजरोसपणे वृक्ष तोड, नव्याने लावलेल्या वृक्षांचे संवर्धन न करणे आदी कारणांमुळे पळसाच्या पानावर जेवण करण्याची परंपरा लोप पावत चालली आहे. सहसा प्लास्टिक पत्रावळी व द्रोणचे विघटन होत नसल्याने पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.

पर्यावरण प्रेमीकडून याबाबत नाराजी व्यक्त होत आहे. पुन्हा एकदा पानांच्या पत्रावळी उपलब्ध झाल्यास त्यांचा नागरिक आनंदाने स्वीकार करतील.

परंतु काळाच्या ओघात पानांच्या पत्रावळी मिळणे शक्य नाही.



**सगळे मिळून तयार करत होतो पत्रावळी...**

गावात कुलदैवतांचा कार्यक्रम, लग्न असेल तर तरुण मुलांना रानात पळसाची पाने आणायला पाठवले जात असे रात्री सगळे एकत्र जमून यापानासून पत्रावळी तयार करायचो. याच पत्रावळीवर गाव जेवण व्हायचे, पण आता पानांच्या पत्रावळी दुर्मिळ झाल्या आहेत.

**पर्यावरणप्रेमीमध्ये नाराजीचा सूर...**

पानांपासून बनवलेली पत्रावळी दुर्मिळ होत असून प्लास्टिक पत्रावळीचा सर्रास वापर होत आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. स्वस्त पर्याय म्हणून लग्न, वाढदिवस, मुंज आणि सार्वजनिक ठिकाणचे भोजन अशा अनेक ठिकाणी प्लास्टिक पत्रावळीचा वापर केला जात आहे. प्लास्टिक पत्रावळी आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. आता फक्त सणावाराला देवांना, पूर्वजांना नैवेद्य दाखविण्या पुरताच पानांचा वापर केला जात आहे.

## लोखंडी राडने प्राणघातक हल्ला; दोन गंभीर

**चौघावर अट्रासिटीचा गुन्हा दाखल...**

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२५ मार्च -**

ट्रॅव्हल्स गाडी वेळेवर का सोडत नाही अशी विचारपूस करत असताना लोखंडी राड व कत्तीने प्राणघातक हल्ला करून जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी निलंगा येथील चौघांविरुद्ध अट्रासिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे निलंगा शहरात तणाव निर्माण झाल्याने जिल्ह्यातील पोलिस बंदोबस्त मागवून कायदा व सुव्यस्था राखण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की विवेक वाल्मिकराव गिरबने हा आपल्या भाऊ व भाचा याला पुण्याला पाठवण्यासाठी निंबाळकर पेट्रोल पंपासमोर आला असता गाडी सुटायला एवढा वेळ का झाला विचारपूस करत असताना आरोपी शाहरूख पाटेवाले, इम्रान पाटेवाले, हकीम पाटेवाले, शुभांगी महेंद्रकर (सर्व रा. शिवाजी नगर निलंगा) व इतर सात ते आठ अनोळखी व्यक्तीने हातात लोखंडी राड, कत्ती, लोखंडी साखळी काठ्या, कुऱ्हाड घेवून फिर्यादि व साक्षिदारास जबर मारहाण जीवे मारण्याची धमकी देत विक्रम वाल्मिक गिरबने व विक्रांत विनोद आर्य या दोघांना डोक्यात मारून गंभीर जखमी केले व लाथाबुक्यानी मारहाण केली आहे. तसेच जीवे मारण्याच्या उद्देशाने हा हल्ला केला आहे.

याबाबत विवेक गिरबने (रा. पेठ निलंगा) यांनी दिलेल्या फिर्यादिवरून शाहरूख पाटेवाले, इम्रान पाटेवाले, हकीम पाटेवाले, शुभांगी महिंद्रकर सर्व राहणार शिवाजी नगर निलंगा व इतर अनोळखी सात ते आठ जणावर निलंगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र फार्मसी टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती रॅली



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२५ मार्च -**

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली टीबी मुक्त भारत अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालय व महाराष्ट्र फार्मसी निलंगा यांच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

क्षयरोग पथक, निलंगा यांच्या वतीने महाराष्ट्र फार्मसी कॉलेज, निलंगा येथे टीबी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. भागवत पौळ आणि डॉ. सिद्धेश्वर पाटील यांच्या हस्ते झाले. तसेच, याप्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप कुमार जाधव आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक हुगे प्रमुख उपस्थित होते.



रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी शिवाजी चौक पर्यंत जनजागृती करत टीबी विषयक माहिती प्रसारित केली. रॅलीनंतर पी.व्ही. करपे यांनी उपस्थितांना टीबीच्या प्रतिबंध, निदान आणि उपचारांबाबत सविस्तर माहिती दिली आणि टीबी निर्मूलनाची शपथ दिली. कार्यक्रमात महाराष्ट्र फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. पौळ, प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी निक्षय मित्र म्हणून पुढाकार घेत ३० क्षयरुग्णांना फूड बास्केट प्रदान केल्या.

कार्यक्रमाचे आभार एम.एस. शेख यांनी मानले. या उपक्रमात व्ही.बी. जाधव, युएचडब्ल्यूसी स्टाफ उपस्थित होते.

## शैक्षणिक प्रशिक्षणाने शिक्षक परिपक्व अध्यापन करतो : प्रा.डॉ. भागीरथी गिरी

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२५ मार्च -**

आज बदललेल्या युगामध्ये सर्वच क्षेत्रात क्रांतिकारक असे स्वरूपाचे बदल झालेले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांना आधुनिक स्वरूपाचे ज्ञान देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने विविध प्रकाराची अभ्यासक्रमाची प्रशिक्षण चालविण्यात येत आहेत. त्यात स्टार्स प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी दीक्षा पोर्टलवर ऑनलाईन कोर्स उपलब्ध करून देण्यात आले होते आणि या कोर्सच्या अटी प्रमाणे ऑनलाइन कोर्स केलेल्या पात्र शिक्षकांची पी.एल.सी. प्रशिक्षण तालुकास्तरावर २२ मार्च २५ रोजी पूर्ण करून घेण्यात आले. प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षक परिपक्व होऊन विद्यार्थ्यांच्या समोर अध्यापन करतो असे आग्रही प्रतिपादन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या डॉक्टर भागीरथी गिरी यांनी केले.



त्या राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे आणि राज्यस्तरीय गरजाधिष्टीत मिश्र माध्यम अभ्यासक्रम प्रशिक्षण २०२४-२५ च्या ऑनलाइन उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. जिल्हा प्रशिक्षण समन्वयक डॉ. जगन्नाथ कापसे, यांच्या मार्गदर्शनानुसार व गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या नियोजनानुसार सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका प्रशिक्षण समन्वयक डॉ. कामाक्षी पवार होत्या.

व्यासपीठावर सुलभक रत्नप्रभा मंडलवार, सुलभक मनीषा गुणाले, सुलभक शिवकुमार मठपती, सुलभक एस.एम. महालिंगे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या की शिक्षकांनी नेहमी स्वतःला अपडेट ठेवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे जाहीर आवाहन केले. अध्यक्षीय समारोप तालुका समन्वयक डॉ. कामाक्षी पवार यांच्या भाषणाने झाला. या शिबिरात मराठी, गणित, विज्ञान, इंग्रजी, सामाजिक शास्त्र, प्राथमिक, माध्यमिक विषयाच्या शिक्षकांनी प्रशिक्षणात सहभाग घेऊन ऑनलाइन मिश्र माध्यमिय अभ्यासक्रम व्यवसायिक अध्ययन समूह पीएलसी प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांना राज्यस्तरीय प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवकुमार मठपती यांनी सूत्रसंचालन माधव मठवाड यांनी तर आभार राम तत्तापूरे यांनी मांनले.

## उमरदरा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२५ मार्च**

तालुक्यातील उमरदरा येथे अखंड हरिनाम सप्ताह ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्री राम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन सद्गुरु गुरुवर्य गुरुबाबा महाराज औसेकर मठाधिपती नाथ संस्थान औसा यांच्या कृपा आशीर्वादाने व श्री सद्गुरु गहिनीनाथ महाराज यांच्या कृपेने अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्रीराम कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.२४ मार्च पासून सुरू झालेल्या या सप्ताहात खालील नामांकित कीर्तकारांची कीर्तन सेवा लाभणार आहे.

व्यासपीठ प्रमुख हभप. प्रकाश महाराज तळेगावकर, रामायणाचार्य हभप. वासुदेव दास बाबा बैरागी कीर्तनकार हभप. गोपाळ महाराज तांदुळवाडीकर.

हभप. शौकत महाराज उमरगा, हभप. हंडे महाराज सिरसल, हभप. संदिपान महाराज हसेगावकर, हभप.विठ्ठल महाराज शिवणखेड, हभप गुरुवर्य नामदेव महाराज दापकेकर, हभप. वासुदेव बाबा बैरागी महाराज टाकळीकर यांचे सुश्राव्य असे किर्तने होणार आहेत.

या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे ग्यानदेव ढोपरे, ज्योतीराम मुदगडे, केवळाबाई शिंदे, ज्ञानोबा ढोपरे, बाळु ढोपरे, भास्कर कदम, उत्तम ढोपरे व समस्त गावकऱ्यांच्या वतीने बाल भजनी मंडळ उमरदरा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## युवकांनी युवा संसदेत परखडपणे आपले विचार मांडावेत : डॉ. करजगी

**जयक्रांती महाविद्यालयात विकसित भारत युवा संसद संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ मार्च -**

युवाकार्य वं क्रीडा मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली वं क्षेत्रीय निर्देशालय, पुणे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, नेहरू युवा केंद्र, नांदेड,लातूर, परभणी, हिंगोली, आणि भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर (वाणिज्य आणि विज्ञान) राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विकसित भारत युथ पार्लमेंट -२०२५ दि.२० व २१ मार्च रोजी जपश Nation, One Election: Paving the Way for Viksit Bharat (एक देश एक निवडणूक : विकसित भारताची दिशा) या विषयावर संपन्न झाली. या युवा संसदेमध्ये नांदेड परभणी हिंगोली लातूर या जिल्ह्यातील एकूण २१० युवक युवतीनी माय भारत पोर्टलवर आपला १ मिनिटाचा व्हिडिओ अपलोड करून नोंदणी केली. यामधून निवडून १३० विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत सहभागी होण्यास सांगितले होते त्यामधून १०० युवकांनी सहभाग घेतला. समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभा, संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, प्राचार्य प्रशांत घार जयक्रांती ज्युनियर कॉलेज, लातूर, नेहरू युवा केंद्र, लातूर जिल्ह्यातील प्रतिनिधी संजय ममदापुरे, डॉ. श्रीधर कोल्हे प्राचार्य, जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालय, लातूर डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी म्हणाले की विकसित भारत युवा संसद ही सर्व युवकांसाठी खुली



असून यामध्ये विषयाशी संबंधित आपले परखड मत युवकांनी मांडावेत आपले विचार आपले मत हेच कदाचित शासन निर्णय घेण्यास भाग पडेल एवढी ताकद युवकांमध्ये असते. युवकांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता आपले मत मांडावेत समाज आणि देशाविषयीची भूमिका स्पष्ट करावी त्यातून राज्यस्तरावर भारतीय संविधानांचे ७५ वर्ष या विषयावर राज्यस्तरीय युवा संसदेमध्ये मध्ये आपल्याला मत मांडायचे आहे. राष्ट्रीय स्तरावर एक देश एक निवडणूक या विषयावर आपले मत मांडायचे आहे. त्याची सखोल तयारी करावी आणि आपला एक एक शब्द अतिशय महत्त्वपूर्ण असावा यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी परीक्षक म्हणून डॉ. भागवत पस्तापुरे, डॉ. राजकुमार पवळे, सहयोगी प्राध्यापक, डॉ. भीमराव पाटील, डॉ. दशरथ भिसे, डॉ. गीता वाघमारे, यांनी परीक्षक म्हणून अतिशय निपक्षपातीपणे जबाबदारी पूर्ण केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. केशव आलगुले, तर आभार डॉ. समिना शेख यांनी मानले.

## शिवाजी विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२५ मार्च -**

तालुक्यातील सताळा येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सताळा येथील वर्ग पहिली ते सातवी आणि शिवाजी विद्यालयात वर्ग आठवी ते दहावी मध्ये शिकवलेल्या सर्व गुरुजनांचा गुरु गौरव सोहळा व सताळा, गुंजोटी, सायगाव, व्हटी आणि दळवेवाडी या गावातील सर्व माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक मुकुंद कुलकर्णी होते.तर विशेष उपस्थिती म्हणून जय हनुमान ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव पुंडलिकराव कदम व सताळा ग्राम पंचायतीचे सरपंच तथा माजी विद्यार्थी लक्ष्मण खंदाडे हे होते. कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती म्हणून जी.आर. जगताप, पी.के. कोंपले, के.टी. जाधव, एस.व्ही. चांदीवाले, एम.जी. चाटे, डी. एच. वाकडे, आर.एस. कराड, आर.आर. मद्देवाड, गणपत महाळंकर, प्रभाकर बेद्रे, एकनाथ कराड, अनिरुद्ध मलवाड, विठ्ठल कदम, गोविंद कोलपूसे, राजकुमार बडगिरे, रघुनाथ वाघमारे, बाबुराव पलाने व आप्पाराव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात २३ मार्च हा शहीद दिन असल्याने भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. दुसऱ्या सत्रामध्ये गुरुजनांचा गुरु गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी अनेक माजी विद्यार्थ्यांनी व सत्कारमूर्तींनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन बाबासाहेब वाघमारे यांनी केले. तर आभार सचिन महाळंकर यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.





# धामणगाव टीबीमुक्त बाजार सांगवी आरोग्य केंद्राला पुरस्कार; वैधकीय अधिकारी डॉ.अंजुम निलोफर यांचा पुरस्काराने सन्मान




खुलताबाद प्रतिनिधी : राष्ट्रीय क्षयरोग दुरी करण कार्यक्रमांतर्गत आज टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियान गौरव सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला. यावेळी दोन वर्षे टीबीमुक्त ग्रामपंचायत अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावली त्यानिमित्त खुलताबाद तालुक्यातील धामणगाव टीबीमुक्त झाल्याचा बाजार सावगी आरोग्य केंद्राला पुरस्काराने सन्मानित केले आहे. महात्मा गांधी यांची प्रतिमा असलेली रजत ट्रॉफी आणि प्रशस्तिपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. बाजार सावगी आरोग्य केंद्राच्या वैधकीय अधिकारी डॉ. अंजुम निलोफर, सी एच ओ, डॉ.शगुफ्ता फरीन यांना जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा क्षयरोग नियंत्रण अधिकारी डॉ.वैशाली डकले यांच्या हस्ते पुरोस्कार देण्यात आला आहे. यावेळी खुलताबाद पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रकाश् नाईक , तालुका आरोग्य अधिकारी डॉ.समाधान राऊत, आरोग्य विस्तार अधिकारी शशिकांत ससाणे, टी.बी सुप्रवायझर राजकुमार दुर्गे सह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (७५) धर्म

भारतीय शिक्षण पद्धती अशी असावी जिथे नैतिक शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रप्रेमाचे जागरण व्हावे. हा दृष्टिकोन समोर ठेवून श्री गुरुजींनी शिक्षा प्रणाली विकसित करण्याचा संकल्प केला. १९४६ साली त्यांनी कुरुक्षेत्र येथे गीता विद्यालय सुरू केले. १९५२ मध्ये उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे सरस्वती शिशु मंदिर योजनेचा श्री गणेशा केला. श्री गुरुजींनी आपल्या उद्-बोधनात सांगितले की-प्रचलित शिक्षण प्रणाली मध्ये धर्मनीती, राष्ट्रभक्ती एवं मातृभूमीबद्दल अनन्य श्रद्धा आदि संस्कारांचा अभाव आहे. या त्रुटी भरून काढण्यासाठी त्यांनी संघ संस्कारांची विद्यालये सुरू केली. या दोन्ही संस्थांचे जाळे हळूहळू भारतभर पसरले. श्री गुरुजी सांगतात धर्म त्यालाच म्हणतात, ज्यामुळे समाजाची धारणा होते. त्यामुळे आपसात सामंजस्याची स्थिती निर्माण होते. श्री गुरुजी म्हणत चंदन, भस्मलेपन, देवता वंदन आणि देवता बंधन देखील आदी बाह्य उपकरणे म्हणजे धर्म नाही. किंवा विविध पंथ संप्रदाय पण धर्म नाही. धर्म परस्पर सहयोग व परस्पर पूरकता शिकवतो. धर्मामुळे व्यक्तीचा नैतिक विकास होतो आणि समाजाची सुव्यवस्था कायम राहते हे सत्य सदैव स्मरणात राहू द्या. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## 'अंतर योग फाउंडेशन तर्फे सर्वात भव्य-दिव्य 'महाचडी होमा'चे आयोजन

छत्रपती संभाजीनगरी :२६ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य दिव्य महाशिवरात्री महोत्सवाचे अत्यंत यशस्वी आयोजन केल्यानंतर, आता 'अंतर योग फाउंडेशन', प्रख्यात आध्यात्मिक सद्गुरु, क्रांतिकारी महानायक आणि ज्ञानाचे महासागर आचार्य उपेंद्रजी यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाचंडी होमा'चे आयोजन २९-३० मार्च २०२५ रोजी, ग्रांडे बँक्वेट, नेस्को, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे करत आहे. २९ आणि ३० मार्च २०२५ या दोन दिवशी सकाळी ८ ते रात्री ८ दरम्यान हे आयोजन होणार आहे. दोन दिवसांच्या या भव्य दिव्य आयोजनादरम्यान अंतर योग फाउंडेशनचे प्रख्यात अध्यात्मिक सदगुरू, आचार्य उपेंद्रजी यांनी रचलेल्या, आजतागायत हजारो लोकांना त्वरीत शक्ती, संपत्ती आणि विवेकबुद्धी एकत्रितपणे मिळवून देणाऱ्या 'अंतर योग श्री दुर्गा सप्तशती तंत्रोक्त बीज मंत्र साधना' या ग्रंथाचे लोकार्पण होणार आहे.

## शनि अमावस्या निमीत्त पैठण येथे महामस्तक अभिषेक महोत्सावाचे भव्य आयोजन

### छत्रपती संभाजीनगर सह देशभरातुन हजारो भक्त उपस्थित राहणार

छत्रपती संभाजीनगर - श्री.शनिग्रह अरिष्ठ निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्र पैठण येथे मुलनायक भारतातील जैन धर्मियांचे शनि अरिष्ठ निवारक श्रध्दा स्थान मुनिसुव्रतनाथ भगवान येथे शनि अमावस्या निमीत्त महामस्तक अभिषेक महोत्सव दिनांक २९/०३/२०२५ शनिवार रोजी आयोजन करण्यात आले आहे. संपुर्ण कार्यकम हा अंतर्मना आचार्य प्रसन्नसागरजी महाराज यांच्या आर्शिवादाने संपन्न होत आहे. सकाळी ८.०० वाजता भगवान मुनिसुव्रतनाथ विधान यानंतर धर्मध्वजारोहन संपन्न होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन तिर्थक्षेत्र कमिटीचे महामंत्री संतोष पेंढारी, तिर्थक्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय पापडीवाल, राष्ट्रीय उपाध्यक्ष निलम अजमेरा, राष्ट्रीय उपाध्यक्ष मिहीर गांधी, तिर्थभक्त किशोर शहा बारामती, सुनिल कोठारी, मनोज जैन हैद्राबाद, अशोक जैन दिल्ली, राजेश मांगीलाल पहाडे हैद्राबाद, अरुणकुमार गंगवाल राजनांदगांव, दिनेशकुमार सतिश सुनिल संतोष सेठी परिवार संभाजीनगर, अनुजकुमार कैलासचंद लोहाडे उपस्थित राहणार आहे.

या प्रसंगी उपस्थित राहणा-या हजारो भाविकांना श्रीमती.शोभादेवी सुभाषचंद पाटणी डॉ.सचिन, सौ. सपना दिनेश वैशाली हार्दिक शुभ कामना पाटणी परिवार मालेगांव वाला यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी त्यागी भवनासाठी दान दिलेले डॉ.रमनलाल, डॉ.निखील, डॉ.स्वप्नील शिरूर कासार बीड,व भरतरावजी प्रभाकर धोंगडे रहाटगांव, श्रीमती.कुसुमबाई किशनलाल काला, कैलास विलास संदीप काला परिवार पैठण शहागड यांचा यावेळी क्षेत्राच्या वतीने सन्मान करण्यात येणार आहे.

तरी धर्मप्रेमींनी तिर्थभक्तांनी अभिषेकाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष महावीर बडजाते,महामंत्री विलास पहाडे,कोषाध्यक्ष विजय पापडीवाल,जयकुमार बाकलीवाल,प्रमोद कासलीवाल,मनोज काला,प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ.संजय गंगवाल,डॉ.राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला, यांच्यासह विश्वस्थ मंडळाने दिली अशी माहिती महामंत्री विलास पहाडे यांनी दिली असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली आहे.

या महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, हैद्राबाद, मुंबई, पुणे, नाशिक, जयपुर, राजस्थान, दिल्ली आदी ठिकाणाहुन हजारो भक्त उपस्थित राहणार आहे. हि शनि अमावस्या दिड वर्षानंतर आली असुन समाज बांधवानी दर्शनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन क्षेत्रातर्फे करण्यात आले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

## प.पु.प्रसाद महाराज अंमळनेरकर यांचे गंगापुर शहरात आगमन



गंगापूर, दि.२५: हभप प्रसाद महाराज अमळनेरकर यांचे गंगापूर येथे दिनांक २६ रोजी आगमन होत असून ते प्रत्येक भक्तांच्या घरोघरी जाणार आहेत यावेळी महाराजांची पाद्य पूजा करता येणार आहे.

प्रतिवर्षी प्रमाणे पैठण येथील नाथषष्ठीचा काला करुण प.पु.प्रसाद महाराज यांचे गंगापुर येथे बुधवारी (दि.२६ ) आगमन होऊन गुरुवारी (दि.२७) रोजी भक्तांच्या घरोघरी पाद्य पुजा करता येईल.तदनंतर दुपारी माहेश्वरी मंगल कार्यालयात गुरु उपदेश देणार असुन संध्याकाळी लासुरस्टेशन कडे प्रयाण करणार आहेत.

तरी भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा घ्यावा असे अवाहन अंमळनेरकर महाराज सेवा संघ गंगापुर यांनी केले आहे.

## सद्गुरु प्रसाद महाराज अंबळनेरकर यांचे बिडकीन येथे स्वागत



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २४ मार्च - पैठण तालुक्यातील बिडकीन येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सद्गुरु श्री प्रसाद महाराज अंबळनेरकर यांचे पायी दिंडीचे आगमन दिलीप देवळाणकर यांच्या निवासस्थानी झाले. याप्रसंगी सुनेत्रा दिलीप देवळांकर यांच्या पत्नीच्या हस्ते महाराजांचे पाद्यपूजन करण्यात आले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व भक्त परिवार हजर होते. महाराजांच्या स्वागतासाठी किसान तोतला,राजु वैद्य, वरद देवळाणकर , संजय दौंड,गणेश आष्टीकर,हेमतराज जोशी, प्रशांत कुलकर्णी, नंदु पिपळवाडकर, प्रवीण मोडे,अविनाश जोशी, बापू खराडकर, प्रवीण मोडे, दीपक डांगरे, योगेश डंबाळे, शैलेश तोतला,गणेश अष्टीकर, प्रशांत कुलकर्णी, खणसे,आदी महिला मंडळ मोठ्या संख्येने हजर होते.

## जागतिक रंगभूमी दिन साजरा

रंगभूमी दीर्घकाळापासून अनेक प्रख्यात कलाकारांसाठी पाया राहिला आहे, त्यांच्यामधील कला, शिस्तबद्धताा आणि पररफॉर्मन्सबाबत सखोल माहितीला आकार देत आहे. जागतिक रंगभूमी दिनानिमित्त रंगभूमीवरून टेलिव्हिजनपर्यंत प्रवास केलेले एण्ड टीव्ही कलाकार रंगमंचाने त्यांना रूपेरी पडद्यासाठी कशाप्रकारे सुसज्ज केले, सामना करावी लागलेली आवहाने आणि रंगमंचाचा आजही त्यांच्या कामावर पडणाऱ्या प्रभावाबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत नीता मोहिंद्रा (कैलाशा बुआ, 'भीमा'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मधील नीता मोहिंद्रा ऊर्फ कैलाशा बुआ म्हणाल्या, ''रंगभूमीसह माझ्या अभिनय प्रवासाला सुरूवात झाली.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. १५६/२०२५
पु.ता.०४/०४/२०२५

अर्जदार : १) सुनिता चिंतामन बोरूडे, वय. ३५ वर्षे, धंदा, शेती व नोकरी, रा. मांगेगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) रूतुजा चिंतामन बोरूडे, वय. १९ वर्षे, धंदा, शिक्षण, रा. मांगेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) विशाल चिंतामन बोरूडे, वय. १७ वर्षे, अ.पा.क. आई अर्जदार क. १ नामे सुनिता चिंतामन बोरूडे, रा. मांगेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, चिंतामन गोपीनाथ बोरूडे हे मौजे मांगेगांव ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. २८/०८/२०२२ रोजी मौजे मांगेगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. अर्जदार क. १ ते ३ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे चिंतामन गोपीनाथ बोरूडे यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ ही मुलगी असुन अर्जदार क. ३ हा अज्ञान मुलगा आहे. या व्यतिरिक्त मयत चिंतामन गोपीनाथ बोरूडे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय / निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप /उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :-२५/०३/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश (मा. इंगोले साहेब) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ८५/२०२५ पु.ता. ०२/०४/२०२५

अर्जदार : १) अरुणा भ्र. शिवाजी खरात, वय ३० वर्षे, धंदा गृहिणी रा. खामगाव ता. बदनापुर जि. जालना २) सोनी भ्र. रविंद्र खरात, वय ४१ वर्षे, धंदा गृहिणी रा. खामगाव ता. बदनापुर जि. जालना

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.के. लांडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ ह्या आपसांत नात्याने सख्या वहिणी असुन अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील नामे शामराव नरहरी पवार हे मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ११/०१/२०२४ रोजी मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे व तसेच अर्जदार क्र.१ व २ यांची आई नामे आनंदीबाई शामराव पवार ह्या दिनांक १७/०६/२०२४ रोजी मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे. मयत शामराव नरहरी पवार व मयत आनंदीवाई शामराव पवार यांना दोन मुली अर्जदार क्र.१ व २ ह्या मुली व एक मुलगा नामे शिवाजी शामराव पवार असे अपत्ये होते त्यापैकी शिवाजी शामराव पवार हा दिनांक ०१/११/२०२२ रोजी मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर येथे मयत झालेला आहे. मृत्युसमयी शिवाजी शामराव पवार हा अविवाहीत होता. मयत शामराव नरहरी पवार व मयत आनंदीवाई शामराव पवार यांना अर्जदार क्र.१ व २ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही दुसरे कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्द्बीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख ०२/०४/२०२५ रोजीची आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २५/०३/२०२५ रोजी दिले आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय गंगापुर

## वडीलांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मुलांने दिले संगणक भेट



तभा वृत्तसेवा बिडकीन दि २५ मार्च आजच्या काळात वाढदिवस म्हटलं की लोक हॉटेल, फटाक्यांची आतषबाजी,मोजमज्जा अशा पद्धतीने साजरा करतात परंतु या सर्व गोष्टींना फाटा देत दैनिक दिव्य मराठीचे वरिष्ठ पत्रकार नंदकुमार वैद्य यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांची मुले विकास वैद्य व सचिन वैद्य यांनी श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे एक संगणक भेट दिला. आजच्या काळात संगणकाचे महत्व लक्षात घेता प्रशालेतील विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने हा संगणक भेट दिला. याप्रसंगी समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ मिलिंद कोनार्डे, शालेय समितीचे सदस्य डॉ.अंताराम धरपळे, प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे, रविंद्र गायकवाड, हसन चाऊस, शिक्षक प्रतिनिधी ज्ञानेश्वर चाटुपळे,शेख मुनाफ, शिवाजी गव्हाणे उपक्रमाबद्दल विकास वैद्य व सचिन वैद्य यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

## जाहीर प्रगटन

जा.क्र.२०२५/भुसु/सिलिंग/जविप/कावि-९९
उप जिल्हाधिकारी (सा.प्र.) कार्यालय, हिंगोली
दिनांक :-२४/०३/२०२५

अर्जदार : १) श्रीमती वंदना संजय लोंढे २) श्री. सिध्देश संजय लोंढे रा. कुंभार गल्ली, गवळीपुरा हिंगोली

विषय : महाराष्ट्र शेतजमीन अधिनियम १९६१ चे कलम २९ (१) नुसार सिलिंग जमीन विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

मौ. सेनगाव ता. सेनगाव गट नं. ९९ क्षेत्र ०० हे ६६. आर

ज्या अर्थी १) श्रीमती वंदना संजय लोंढे २) श्री. सिध्देश संजय लोंढे रा. कुंभार गल्ली, गवळीपुरा हिंगोली यांनी महाराष्ट्र शेतजमीन अधिनियम १९६१ चे कलम २९ (१) नुसार सिलिंग जमीन प्राप्त झालेली मौ. सेनगाव ता. सेनगाव गट नं. ९९ क्षेत्र ०० हे ६६. आर ही जमीन श्री. तनुष संजयकुमार बगडीया रा. महावीर चौक, हिंगोली यांना विक्री करणे बाबत या कार्यालयात प्रस्ताव सादर केला आहे.

त्या अर्थी सर्व जनतेस या कार्यालयाचे जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, १) श्रीमती वंदना संजय लोंढे २) श्री. सिध्देश संजय लोंढे रा. कुंभार गल्ली, गवळीपुरा हिंगोली यांना महाराष्ट्र शेतजमीन अधिनियम १९६१ चे कलम २९ (१) नुसार सिलिंग जमीन प्राप्त झालेली मौ. सेनगाव ता. सेनगाव गट नं. ९९ क्षेत्र ०० हे ६६.५० आर ही जमीन रुपये ७४,००,०००/- (अक्षरी चौऱ्याहत्तर लाख केवळ एवढ्या किमतीत श्री. तनुष संजयकुमार बगडीया रा. महावीर चौक, हिंगोली यांना विक्री करणार आहेत. ही जमीन विक्री करण्या संबंधी जर कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप लेखी स्वरुपात आवश्यक त्या कागदपत्रासह स्वतः किवा वकीला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिध्दी झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाचे आत समक्ष सादर करावेत.

मुदती नंतर प्राप्त झालेल्या आक्षेपावर कसल्याही प्रकारे विचार केला जाणार नाही आणि सदर प्रकरणात रितसर नियमा प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(अनिल मचिवाड)
उप जिलाधिकारी (सा.प्र.)
हिंगोली

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश मा. इंगोले साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ९३/२०२५ पु.ता. ०३/०४/२०२५

अर्जदार : १) भास्कर रामा घोगरे, वय. ५८ वर्षे, धंदा, शेती, रा. काटेपिंपळगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ह.मु. इंदुरी ता. मावळ जि. पुणे २) विठ्ठल रामा घोगरे, वय. ४६ वर्षे, धंदा, शेती, व खाजगी नौकरी, रा. काटेपिंपळगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ह.मु. राजे शिवाजीनगर, चिखली प्रधीकरण, पुणे ता. हवेली जि. पुणे ३) सुदाम रामा घोगरे, वय. ४३ वर्षे, धंदा, शेती व नौकरी, रा. काटेपिंपळगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ह.मु. डुडुळगांव ता. हवेली जि. पुणे ४) कल्पना सुभाष निगोटे, वय. ५५ वर्षे, धंदा, शेती, रा. हडस पिंपळगांव ता. वैजापूर जि. औरंगाबाद ५) रूखमनबाई रामचंद्र आढाव, वय. ५० वर्षे, धंदा. शेती. रा. आपेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ ते ५ चे वडील नामे रामा (रामभाऊ) गणपत घोगरे हे दि. ०८/०१/१९९३ रोजी मौजे काटेपिंपळगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत तसेच, अर्जदार क. १ ते ५ ची आई नामे लक्ष्मीबाई रामा घोगरे हाया मौजे काटेपिंपळगांव ता. गंगापूर येथील रहीवासी असून हया दि. २७/०६/२०२३ रोजी मौजे पिंपरी चिंचवड ता. हवेली जि. पुणे येथे उपचारा दरम्याण मयत झालेल्या आहे. अर्जदार क. १ ते ५ हे आपसात सख्खे बहीन भाऊ असून आपसात नातेवाईक आहे. अर्जदार क. १ ते ५ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे लक्ष्मीबाई रामा घोगरे यांना अर्जदार क. १ ते ५ हे एकमेव कायदेशीर वारसदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयतांच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ५ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप / उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :- २५/०३/२०२५

आदेशावरून
कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क.स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ८४/२०२५ पु.ता. ०२-४-२५

अर्जदार : १) अरुणा भ्र. शिवाजी खरात, वय ३० वर्षे, धंदा गृहिणी रा. खामगाव ता. वदनापुर जि. जालना २) सोनी भ्र. रविंद्र खरात, वय ४१ वर्षे, धंदा गृहिणी रा. खामगाव ता. वदनापुर जि. जालना

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम ३७२ भारतीय वारसा कायदयान्वये वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.के. लांडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ ह्या आपसांत नात्याने सख्या वहिणी असुन अर्जदार क्र.१ व २ यांचे वडील नामे शामराव नरहरी पवार हे मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ११/०१/२०२४ रोजी मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे व तसेच अर्जदार क्र.१ व २ यांची आई नामे आनंदीवाई शामराव पवार ह्या दिनांक १७/०६/२०२४ रोजी मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे. मयत शामराव नरहरी पवार व मयत आनंदीबाई शामराव पवार यांना दोन मुली अर्जदार क्र.१ व २ ह्या मुली व एक मुलगा नामे शिवाजी शामराव पवार असे अपत्ये होते त्यापैकी शिवाजी शामराव पवार हा दिनांक ०१/११/२०२२ रोजी मौजे गुरुधानोरा ता. गंगापुर येथे मयत झालेला आहे. मृत्युसमयी शिवाजी शामराव पवार हा अविवाहीत होता. मयत मयत शामराव नरहरी पवार व मयत आनंदीवाई शामराव पवार यांना अर्जदार क्र.१ व २ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही दुसरे कायदेशीर वारसदार नाही. अ) मयत शामराव नरहरी पवार यांचे नावे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा शेंदुरवादा ता. गंगापुर येथे बचत खाते क्र.०००००८०००४५३५६२८ असा असून सदरील खात्यामध्ये रक्कम रुपये ६,५९७/- (अक्षरी सहा हजार पाचशे सत्यान्नव रुपये) आजपर्यंत जमा आहेत. व) मयत आनंदीवाई शामराव पवार यांचे नावे महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा शेंदुरवादा ता. गंगापुर येथे वचत खातं क्र.०००००८००१२१०२०३८ असा असून सदरील खात्यामध्ये रक्कम रुपये १,४१,७२०/- (अक्षरी एक लाख एकेचाळीस हजार सातशे वीस रुपये) आजपर्यंत जमा आहेत. ती रक्कम मिळण्यासाठी अर्जदार यांनी वरील अर्ज या न्यायालयात मयताचे वारसप्रमाणपत्र मिळणे कामी सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्द्बीनंतरचा आक्षेप - उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. प्रकरणात पुढील तारीख ०२/०४/२०२५ रोजीची आहे, करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २५/०३/२०२५ रोजी दिले आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## 'जागतिक जल दिन' साजरा

मुंबई - संपूर्ण जग 'जागतिक वन दिन' आणि 'जागतिक जल दिन' साजरा करत असताना, टोयोटा किर्लोस्कर मोटर म्हणजेच टीकेएमने पर्यावरण संवर्धनासाठी आपली कटिबद्धता पुन्हा एकदा दृढ केली आहे. टोयोटाच्या 'ग्लोबल टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५०' (टीईसी २०५०) या दृष्टीकोनात, 'शून्य पर्यावरणीय परिणामाच्या पुढे जाऊन, निव्वळ सकारात्मक परिणाम साध्य करण्याच्या' सहा महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांचा समावेश आहे. यात पाण्याचा वापर कमी करणे आणि पाण्याचे योग्यप्रकारे व्यवस्थापन करणे तसेच भविष्यात निसर्गाशी सुसंगत समाज निर्माण करण्याचा समावेश आहे.

## केसरबाई दांडगे यांचे निधन



सोयगाव, दि.२५ मार्च : तालुक्यातील जरंडी येथील केसरबाई भागाजी दांडगे(वय. ९६) यांचे सोमवारी (दि.२४) पहाटे नऊ वाजता निधन झाले त्यांचेवर सायंकाळी सात वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.येथील ग्रामपंचायत सद्स्य लिलाबाई निकम यांच्या आई व स्वप्नील बिरारे यांच्या त्या आजी होत.

# सोयगाव नगरपंचायत सोयगाव

## ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर

Email: npsoegaon@gmail.com

जा.क्र. कावि./नपंसो/२०२५ - दिनांक : २५/३/२०२५

### जाहीर प्रसिध्दी पत्रक

सर्व जनतेस या जाहीर प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, नगरपंचायत कार्यालय मोयगाय ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर येथील आठवडी बाजार कर वसुली लिलाव माठी मंगळवार दिनांक ०१/०४/२०२५ रोजी नकाळी ११.०० वाजता नगरपंचायत कार्यालयात वर्ष ०१/०४/२०२५ ने ३१/०३/२०२६ या मुदतीसाठी खालील नमूद केल्याप्रमाणे नगदी स्वरुपात लिलाव करण्याचे ठरविले आहे. आठवडी बाजाराचा दिवस मंगळवारी आहे. लिलाव घेण्यापूर्वी खालील अनामत डी.डी. द्वारे भरणा करावी लागेल याशिवाय निलावात भाग घेता येणार नाही. तरिही योग्य बोली न आल्यास पुढील लिलावाची तारीख व वेळ घोषीत करण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी यांना राहिल.

| अ.क्र. | बाब | अनामत रक्कम | मुदत |
|---|---|---|---|
| १ | आठवडी बाजार | ५००००/- | ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ |

अंतिम बोली स्विकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी नगरपंचायत सोयगाव यांनी राखून ठेवला आहे. लिलावाच्या नियम व अटी तसे जाहीरनामा नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत शासकीय सुट्ट्या मोडून पाहावयास मिळतील, थकबाकीदारास लिलावात भाग घेता येणार नाही. तरी कृपया गरजूनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

## अग्रलेख...

# समजुतीच्या वर्मावर बोट!

आपल्या प्राचीन ग्रंथांनी न्यायव्यवस्थेचे एक आशादायी चित्र हजारो वर्षांपूर्वी रंगविले आहे. 'न्यायमूलं सुराज्यं स्यात' ही आपल्या परंपरेची समजूत आहे. भक्कम, पारदर्शक आणि विश्वासार्ह न्यायव्यवस्था आणि कायद्याचे प्रामाणिक पालन करण्याची जाणीव हा सुराज्याचा पाया असतो, अशी या प्राचीन परंपरेची समजूत आहे. ती केवळ समजूतच नाही, तर तो आपल्या सांस्कृतिक परंपरेचा भागच आहे. याच विचारावर आपल्या लोकशाहीची श्रद्धा असल्यामुळे, आपल्या देशाच्या राज्यघटनेची प्रस्तावनादेखील कायद्याचे राज्य याच संकल्पनेची अभिव्यक्ती आहे. या विश्वासमुळेच, सत्याच्या बाजूने कणखरपणे उभे राहण्याची ताकद सामान्य माणसाला मिळाली आहे. ही व्यवस्था वादातीत असावीच, पण ती जलद, पारदर्शक आणि परवडणारीदेखील असावी अशी जनतेची अपेक्षा असते, पण दुर्दैवाने तशी परिस्थिती दिसत नाही अशी खंत गेल्या दोन दशकांपासून देशाच्या हितरक्षणाचे सर्वोच्च विश्वस्त असलेल्या राष्ट्रपतिपदावरील जवळपास प्रत्येक व्यक्तीने वारंवार व्यक्त केली आहे. सुमारे नऊ वर्षांपूर्वी, २०१६ मध्ये याच महिन्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षसोहळ्याच्या प्रारंभ समारोहात बोलताना तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी तेव्हाचे सरन्यायाधीश टी. स. ठाकूर यांच्या उपस्थितीत हे बोल न्यायव्यवस्थेस सुनावले होते. लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यात न्यायव्यवस्था अजूनही यशस्वी ठरलेली दिसत नाही, असा स्पष्ट दावा त्यांनी केला आणि त्यानंतर पुढे अनेक दिवस न्यायव्यवस्थेची कार्यप्रणाली, त्रुटी आणि कारभाराविषयीच्या चर्चा उघड किंवा कानगोष्टींच्या स्वरूपात समाजात सुरू झाल्या. न्यायालयात न्याय मिळतो, अशी आपल्या देशातील जनतेची समजूत आहे. कारण न्यायव्यवस्था हा लोकशाहीच्या प्रमुख आधारस्तंभांपैकी एक भक्कम आधारस्तंभ आहे. पण काही वेळा या समजुतीला धक्का लागावा अशी परिस्थिती उद्भवते आणि न्यायालयात खरोखरीच न्याय मिळतो का, असा प्रश्न सामान्य जनतेस पडतो. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी जी मते नऊ वर्षांपूर्वी व्यक्त केली होती, त्याच मतांशी सहमती दर्शविणारी मते पुढे पाच वर्षांनी, मार्च २०२१ मध्ये तेव्हाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी व्यक्त केली होती. भारतीयांना या देशातील न्यायपालिकेकडून मोठ्या अपेक्षा आहेत. आपले न्यायाधीश हे विद्वान, नि:स्पृह, तटस्थ आणि उच्च विचारांचे असावेत अशी समाजाची अपेक्षा असते. न्यायव्यवस्थेत संख्येपेक्षाही गुणवत्तेला अधिक महत्त्व दिले जाते. सर्वसामान्य माणसांसाठी न्यायपालिका हा शेवटचा आसरा असून न्यायव्यवस्थेवर लोकांचा विश्वास कायम राहणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत राष्ट्रपती कोविंद यांनी मध्य प्रदेशातील जबलपूर येथे 'ऑल इंडिया स्टेट ज्युडिशियल अकेडमीज डायरेक्टर्स' रिट्रीट'च्या उद्घाटनप्रसंगी बोलताना व्यक्त केले होते. याच मताचा पुनरुच्चार पुढे ७ एप्रिल २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुवाहाटी येथील गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या ७५ व्या स्थापना वर्षपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना केला, तेव्हाही पुन्हा एकदा न्यायालयांची कार्यपद्धती, विश्वासार्हता आणि न्यायव्यवस्था याविषयी जनतेच्या मनात भावनांचा एकत्रित संमिश्र कल्लोळ माजला. व्याख्येनुसार विचार करता, न्याय हा समावेशक आणि म्हणूनच सर्वांसाठी सुलभतेने उपलब्ध असला पाहिजे, पण न्याय मिळण्याच्या मार्गात अनेक घटकांचे अडथळे असतात. न्यायासाठी मोजावा लागणारा पैसा हा त्यापैकीच एक घटक आहे, असे राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या होत्या. आज पुन्हा एकदा, देशातील जनता त्यांचे हे परखड मत एका पारड्यात घालून न्यायव्यवस्थेची विश्वासार्हता तोलण्यासाठी प्रयत्न करू लागली आहे. कारण, देशाच्या न्यायालयांनी जगातील या सर्वांत मोठ्या लोकशाहीच्या न्यायव्यवस्थेचे जागरूक संरक्षक म्हणून अमूल्य योगदान दिले आहे, अशी जनतेची भावना आहे. न्यायाविषयी श्रद्धा आणि न्याय व्यवस्थेविषयी आदरभावना आपल्या परंपरेचा भाग आहे, म्हणूनच देशातील प्रत्येक न्यायाधीशाला येथील जनता देव मानते. कारण, धर्म, सत्य आणि न्याय यांचा आदर करण्याची नैतिक जबाबदारी आपल्या देशातील प्रत्येक न्यायाधीश आणि न्यायिक अधिकाऱ्याची आहे, अशी या देशातील जनतेची भावना आहे. सर्वोच्च न्यायालयापासून जिल्हास्तरावरील न्यायालयांपर्यंत प्रत्येक न्याययंत्रणेमध्ये असलेली या नैतिक जबाबदारीची जाणीव हे न्यायव्यवस्थेचे दीपगृह आहे. न्यायालयांच्या कारभारातूनच कोट्यवधी नागरिकांच्या मनात न्यायव्यवस्थेची प्रतिमा निर्माण होत असते, त्यामुळे संवेदनशीलतेने व तत्परतेने व कमी खर्चात जनतेला न्याय देणे हा आपल्या न्यायव्यवस्थेच्या यशाचा पाया आहे, अशी जनतेची श्रद्धा आहे. प्रत्यक्षात मात्र या व्यवस्थेविषयी राष्ट्रपतिपदावरील व्यक्तींनी गेल्या अनेक वर्षांत व्यक्त केलेल्या भावना आणि या व्यवस्थेचे वर्तमान यांतील तफावत अजून कायमच असल्याचे दिसते. सीझरची पत्नी संशयातीत असली पाहिजे, असा एक राजकीय संवाद जगप्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्सपियरने त्याच्या एका नाटकात ज्युलियस सीझर या राजाच्या तोंडी घातला आहे. न्यायव्यवस्था ही भ्रष्टाचार आणि लाचखोरीच्या आरोपांतून वादातीतपणे मुक्त असली पाहिजे, या भावनेचा या संवादाशी थेट संदर्भ आहे. प्रत्यक्षात न्यायव्यवस्थेतील अनेकांवर भ्रष्टाचाराच्या आरोपांचे शिंतोडे असल्याने, पुन्हा एकदा पुराणातील ग्रंथात आणि परंपरेने व्यक्त केलेल्या अपेक्षांच्या कसोटीस उतरण्याचे आव्हान लोकशाहीचा हा प्रमुख आधारस्तंभ असलेल्या न्यायव्यवस्थेसमोर उभे ठाकले आहे.

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी गेल्या १४ मार्च रोजी लागलेल्या आगीत कोट्यवधींची रोकड आढळून आल्याचा आरोप झाल्यामुळे हे आव्हान आता अधिक गडद झाले आहे. घरातील एका साठवणुकीच्या खोलीत पोत्यांमध्ये भरलेली रक्कम आढळल्याचा आरोप होऊ लागल्याने, न्यायव्यवस्थेकडे संशयातीत असण्याच्या अपेक्षेने पाहणाऱ्या न्यायश्रद्ध जनतेच्या मनात आता संशयाचे भुंगे भिरभिरू लागले आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्याचा आदेश देण्यात आला असतानाच, सर्वोच्च न्यायालयानेच या घटनेशी संबंधित अशी एक चित्रफीत जारी केल्याने या संशयांच्या गर्तेतून स्वच्छ अवस्थेत बाहेर पडणे ही केवळ त्या न्यायाधीशाचीच नव्हे, तर न्यायव्यवस्थेचीही जबाबदारी ठरते. न्यायालयांमध्ये भ्रष्ट मार्गाने न्याय विकला जात असेल, तर तो केवळ न्यायव्यवस्थेच्या प्रतिमेवरील डाग नसतो, तर न्याय विकला गेल्यास न्यायाचा हक्क असलेल्यांना त्यापासून वंचित राहावे लागत असल्याने, असा भ्रष्टाचार उघडकीस आलाच, तर तो एक मोठा सामाजिक धक्का म्हणावा लागेल. कोणतीही वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असेल, तर खरेदी करण्याची क्षमता असलेल्यांना ती प्राप्त होऊ शकते आणि गरज असूनही क्षमता नसलेल्या व्यक्ती त्यापासून वंचित राहतात. न्यायाधीशाच्या घरात पोत्यांमध्ये भरलेल्या नोटा असल्याचा आरोप खरा नाही, हे सिद्ध झाले नाही, तर न्याय विकून पैसा कमावला जात असल्याच्या भावना बळावतील आणि ते संपूर्ण न्यायव्यवस्थेवरील शिंतोडे ठरतील. होळीच्या रात्री न्यायाधीश वर्मा यांच्या घरातील आगीत अर्धवट जळालेल्या स्थितीतील नोटांची छायाचित्रे आणि चित्रफिती सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी रात्री आपल्या माहितीजालावरच प्रसिद्ध केल्या. न्यायाधीश वर्मा यांनी मात्र या आरोपापासून हात झटकले असले, तरी या प्रकरणाच्या खोलात जाण्याची गरज स्पष्ट झाल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाच्या या चौकशी अहवालात नोंदविल्याचे सांगण्यात येते. सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या चौकशी समितीने आपला २५ पानी अहवाल सादर केल्यानंतर तूर्तास वर्मा यांना न्यायप्रक्रियेपासून दूर राखण्याचा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे, आता केवळ भावनांच्या आहारी न जाता, पुरावे आणि वस्तुस्थिती यांच्या आधारे कार्यवाही करून न्यायसंस्थेच्या विश्वासार्हतेची जपणूक करण्याची जबाबदारी न्याय प्रक्रियेवर पडली आहे. अगोदरच, राष्ट्रपतींपासून सामान्य माणसापर्यंत सर्वांना या व्यवस्थेच्या क्षमता आणि प्रामाणिकपणाविषयी शंका आहेत. त्यामध्ये भर घालणाऱ्या अशा कथित घटनांतून त्याला बळकटी मिळणार नाही, याची खबरदारी न घेतल्यास जनतेच्या मनातील संशयाच्या वर्मावर बोट ठेवले जाईल.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# आत्मनिर्भर युरोपसाठी सरसावला जर्मनी!

जर्मनीतील निवडणुका या संमिश्र स्वरूपाच्या असतात. १) बहुमत पद्धती (मेजॉरिटी सिस्टिम)- या पद्धतीत ज्याला सर्वांत जास्त मते मिळतात, तो त्या मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून निवडला जातो. त्याला एकूण मतदानाच्या निदान ५० टक्के तरी मते मिळालीच पाहिजेत, असा आग्रह नसतो. या सोबत प्रमाणशील प्रतिनिधित्व पद्धतीनेही (प्रपोर्शनल रिप्रेझेंटेटिव्ह सिस्टिम - यादी पद्धती) उमेदवार निवडले जातात. २) यादी पद्धती - समजा चार पक्षांनी निवडणूक लढविली आहे. यांना एकूण ९६ उमेदवार निवडायचे आहेत. हे चार पक्ष निवडणुकांपूर्वी प्रत्येकी ९६ उमेदवारांची यादी प्रसिद्ध करतील. मतदार पक्षाला मतदान करतात. समजा अ पक्षाला ५० टक्के, ब पक्षाला २५ टक्के आणि क व ड पक्षांना प्रत्येकी १२.५ टक्के मते मिळाली तर अ पक्षाचे यादीतील निम्मे म्हणजे पहिले ४८ उमेदवार निवडून येतील, ब पक्षाचे २४ उमेदवार निवडून येतील आणि क व ड पक्षाचे प्रत्येकी १२ प्रतिनिधी निवडून येतील. जर्मनीच्या लोकसभेत ६३० सदस्य असतात. यापैकी बहुमत पद्धतीने २९९ सदस्य निवडले जातात. ६३० - २९९ = ३३१. ३३१ उमेदवार यादी पद्धतीने (प्रमाणशील प्रतिनिधित्व पद्धती) निवडले निवडले जातात. ओव्हरहँग सीट्स - पण समजा एखाद्या पक्षाचे बहुमत पद्धतीनुसार ७५ उमेदवार निवडून आले, पण यादी पद्धतीनुसार कमी (समजा ७०) उमेदवारच निवडून आले असतील तर त्या पक्षाला ५ अधिकच्या जागा मिळतील. यांना 'ओव्हरहँग सीट्स' असे म्हणतात. यामुळे जर्मनीच्या 'बुंडेस्टॅग'मधील सदस्य संख्या बदलती असते.

जर्मनीमध्ये २३ फेब्रुवारी २०२५ या दिवशी निवडणुका पार पडल्या आहेत. १) कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाने २०८ जागा जिंकल्या आहेत. जर्मनीतील विद्यमान विरोधी पक्ष नेते फ्रेड्रिक मर्झ यांचा चान्सलरपदी आरूढ होण्याचा मार्ग या विजयामुळे मोकळा झाला आहे. पण जर्मनीच्या बुंडेस्टॅगमध्ये (पार्लमेंट) एकूण ६३० जागा असून बहुमतासाठी ३१६ जागा आवश्यक आहेत. त्यामुळे याही वेळी नवे सरकार हे परंपरेप्रमाणे आघाडीचेच राहील. विद्यमान चान्सलर ओलाफ शोल्झ यांच्या एसपीडीने १२० जागा जिंकल्या आहेत. एसपीडीबरोबर आघाडी करण्यावाचून दुसरा पर्याय मर्झ यांच्यासमोर दिसत नाही. या दोन पक्षांना मिळून (२०८+१२०) ३२८ जागांचे बहुमत असू शकेल. स्थलांतरितांबाबत या युतीचा पवित्रा शोल्झ किंवा मर्केल यांच्यापेक्षा अधिक कठोर असेल. सर्व स्थलांतरित हे बिचारे आश्रयार्थी नसतात तर त्यांच्यामध्ये उपद्रवी दहशतवादी, धर्मपिसाट अतिरेकीही असतात, असा अनुभव युरोपमधील राष्ट्रांना आलेला आहे. यापुढेही जर्मनी आणि युरोप युक्रेनच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील, असेही मर्झ यांनी जाहीरपणे नमूद केले आहे.

२) २० टक्के मते मिळविणाऱ्या आणि नाझी पृष्ठभूमी असलेल्या तरुण, उच्चशिक्षित आणि तडफदार, पक्षविरोध झुगारून समलिंगी विवाह करणाऱ्या, एक उभरते नेतृत्व म्हणून मान्यता पावलेल्या, निर्वासित विरोधक असलेल्या अलाईस वीडेल यांच्या अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी (एएफडी) या अतिउजव्या पक्षाचा क्रम दुसरा (१५२ जागा) आहे. म्हणजे या निवडणुकीत खरी बाजी मारली ती अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी (एएफडी) या पक्षाने. नाझीवादी आणि ट्रम्प समर्थक आणि अतिउजव्या पक्षाची ही अनपेक्षित मुसंडी या पक्षाची आजवरची सर्वोत्तम कामगिरी आहे. या विजयामुळे जर्मनीतील आणि युरोपातील शांततावादी हादरले आहेत. अमेरिकेचे नुकतेच निवडून आलेले अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने या निवडणुकीत ढवळाढवळ केली होती. या पृष्ठभूमीवर फ्रेड्रिक मर्झ यांच्या (ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन) सीडीयू आणि मर्कस सोडर यांच्या फक्त बव्हेरिया प्रांतातील ख्रिश्चन सोशल युनियन (सीएसयू) युतीला २८.५ टक्के मते मिळाली, ही बाबही नोंद घ्यावी अशी आहे. ३) विद्यमान चान्सलर ओलाफ शोल्झ यांच्या सोशल डेमोक्रॅटिक पार्टीला (एसपीडी) फक्त १६.५ टक्के मते (१२० जागा) मिळाली आणि जर्मनीतील या सर्वांत जुन्या पार्टीचा निवडणुकीत पार धुव्वा उडाला. ४) फेलिक्स बेनॅझॅक/रॉबर्ट हॅबेक यांचे हरित उदारमतवादी अलायन्स ९० व ग्रीन पार्टी या संयुक्त पक्षाला १२ टक्के मते (८५ जागा) मिळाली तर ५) ख्रिश्चियन डर यांच्या उदामतवादी फ्री डेमोक्रॅटिक पार्टीला (एफडीपी) ५ टक्क्यांचा किमान उंबरठाही न ओलांडता आल्यामुळे स्पर्धेतून बादच व्हावे लागले. ६) हीडी रिचिनेकव जान व्हान अकेन यांच्या दी लेफ्ट डाय लिंके या डाव्या पक्षाला ९ टक्के मते (६४ जागा) मिळाली. ७) यांच्यातीलच बुंडिस साहरा वागेनक्नेच्ट अलायन्स (बीएसडब्ल्यू) या अतिडाव्या फुटीर गटाला किमान ५ टक्के मतांचा उंबरठा कसाबसा ओलांडता आला.

जर्मनी हा युरोपातला सर्वांत जास्त लोकसंख्या असलेला आणि सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेला देश आहे. संपूर्ण जगात तिचा तिसरा क्रमांक आहे. त्यामुळे युरोपियन युनियनचे अर्थकारण आणि राजकारण, जर्मनी काय भूमिका घेतो यावर अवलंबून असते. जर्मनीत कोणाची सत्ता येते, याचा परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणावर आणि जागतिक व्यापारावरही होत असतो. अमेरिकेवरील अवलंबित्व दूर करून युरोपला आत्मनिर्भर बनविण्यावर मर्झ यांचा भर असणार आहे. अण्वस्त्रधारी फ्रान्स आणि ब्रिटन यांनी जर्मनीसोबत जायचे ठरविले तर ही बाब अशक्य नाही. युरोपमधील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थेच्या प्रमुखपदी मर्क यांचा विजय ही ट्रम्प यांच्याविरोधाची युरोपातील नांदी मानली जाते आहे. अशीच सडेतोड भूमिका त्यांनी रशियाविरुद्धही घेतली आहे. असे करणे कठीणच होते. कारण रशियातून जर्मनीपर्यंत टाकलेल्या वाहिनीतून जर्मनीला इंधनाचा पुरवठा होत असतो. पण त्याचे काय होईल याची चिंता त्यांनी केली नाही. कारण रशियालाही कोणाला न कोणाला इंधन विकणे भागच आहे, हे ते जाणून आहेत.

या निवडणुकीत (१) हवामान बदल (क्लायमेट चेंज) हा महत्त्वाचा मुद्दा ठरला. ग्रीन पक्षाला मिळालेला वाढता प्रतिसाद त्याचेच द्योतक आहे. आशियाचा विचार केला, तर (२) चीनच्या प्रभावाला प्रत्युत्तर देण्यासाठी जर्मनीला भारताची साथ महत्त्वाची वाटते. तसेच भारत आणि जर्मनी हे दोन्ही देश संयुक्त राष्ट्रांच्या (३) सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी स्थानासाठीही प्रयत्नशील आहेत. दोन्ही देशांत आजवर सांस्कृतिक, आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत देवाणघेवाण होत आली आहे. (४) युक्रेनला मदत, (६) इस्लामी स्थलांतर आणि ७) आर्थिक विवंचना हे मुद्देही या निवडणुकीत महत्त्वाचे ठरले.

अमेरिकेचे 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' हे धोरण; अमेरिका आणि रशिया यांच्यात सुरू झालेली जवळीक; युक्रेन आणि युरोप यांनीच आपापले हितसंबंध जपावेत अशी ट्रम्प यांची भूमिका; या पृष्ठभूमीवर अमेरिकेला वगळून युरोपियन राष्ट्रांचे आत्मनिर्भर संघटन उभारण्याचा धाडसी मनोदय मर्झ यांनी निवडणुकीपूर्वीच व्यक्त केला होता. असा युरोप जर अमेरिका, रशिया आणि चीन यांच्या समोर बरोबरीच्या नात्याने उभा राहू शकला तर ती जगाच्या इतिहासातील महत्त्वाची घटना ठरेल, याबाबत शंका नाही.

९४२२८०४४३०

## इतस्ततः


**दत्तात्रेय आंबुलकर**

# कंपन्यांचे कर्मचाऱ्यांना असेही प्रोत्साहन

मार्च महिना म्हटला की, कॉर्पोरेट क्षेत्रात कर्मचाऱ्यांना वेध लागलेले असतात ते पगारवाढीचे आणि व्यवस्थापनाचे लक्ष असते ते कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामगिरीच्या मूल्यमापनाकडे. याबरोबरच काही कंपन्या वर्षभर सामाजिक वा परोपकारी क्षेत्रात आपल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या इच्छेनुसार काम करावे, यासाठी प्रयत्नशील असतात. तेव्हा कॉर्पोरेट क्षेत्रातील अशाच या आगळ्यावेगळ्या प्रोत्साहनाविषयी...

कंपन्या व कंपनी व्यवस्थापनातर्फे आपापल्या स्तरावर व विविध प्रकारे कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले जाते. या प्रोत्साहनाचा वा अशा उपक्रमांचा फायदा कर्मचारी-कंपनी या उभयतांना होत असतो. यामध्ये प्रत्यक्ष व्यवसाय वा तत्सम कामावर भर असणे स्वाभाविक असते. मात्र, त्याशिवाय अन्य प्रकारे व विविध स्वरूपात पुढाकार घेऊन सामाजिक वा परोपकारी क्षेत्रात आपल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या इच्छेनुसार व आवर्जून काम करावे, यासाठी भारतातील प्रमुख कंपन्या ज्या प्रकारे व पद्धतीने त्यांना प्रोत्साहन देत आहेत, ते मुळातून पडताळून पाहणे महत्त्वाचे ठरते. कंपनीच्या कर्मचाऱ्यांना विविध प्रकारे परोपकारी व सामाजिक काम करण्यासाठी आवर्जून प्रोत्साहित करणाऱ्या कंपन्यांमध्ये आपल्याकडील 'इन्फोसिस', 'प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल', 'कॅप-जेमिनी', 'स्टॅण्डर्ड चार्टर्ड', 'हिंदुस्थान युनिलिव्हर', 'वेट-ॲप व प्राईस ॲण्ड वॉटर' यांसारख्या कंपन्यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

या उदाहरणादाखल नमूद केलेल्या कंपन्यांतर्फे आपल्या कर्मचाऱ्यांना समाजातील विविध घटक व क्षेत्रांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या शिक्षण, प्रशिक्षण व कौशल्य विकास, आरोग्यसेवा, नागरी सेवा व आपत्ती व्यवस्थापन व नियंत्रण इत्यादी विषयात स्वयंस्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते; प्रसंगी मार्गदर्शन केले जाते. विविध कंपन्यांच्या या समाजाभिमुख व कर्मचारीपूरक उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. कंपन्यांतर्फे कर्मचाऱ्यांना समाजसेवेसाठी देण्यात येणाऱ्या प्रयत्नांमध्ये त्यांनी या कामी अधिकाधिक वेळ परिणामकारकरीत्या देणे, त्यासाठी आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविणे, त्यांच्या प्रयत्नांचे मूल्यमापन करून त्यांना आवश्यकतेनुरूप मार्गदर्शन करणे, त्यांच्या समाजसेवी प्रयत्नांना अधिक परिणामकारक करणे व अशा प्रकारे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामाच्या तासांमधून सवलत व मुभा देणे, त्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे इत्यादींचा समावेश आहे. याशिवाय काही कंपन्यांमध्ये तर सातत्यपूर्ण व परिणामकारकपणे



समाजोपयोगी कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या यशस्वी प्रयत्नांची दखल त्यांच्या कामकाजाचे वार्षिक मूल्यमापन व पगारवाढीच्या वेळी केले जाते, हे यासंदर्भात उल्लेखनीय.

कंपन्यांतर्फे कर्मचाऱ्यांना सुलभ व सामान्य-जनांना उपयुक्त व प्रसंगी कमी वा फावल्या वेळात करता येण्यासारख्या कार्यक्रम आणि उपक्रमांना आवर्जून प्राधान्य दिले जाते. यामध्ये इंजिनीअरिंग अथवा 'एमबीए' पात्रता पूर्ण केलेल्या अथवा करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मुलाखतीची पूर्वतयारी, संवाद-संभाषण कला, व्यक्तिमत्त्व विकाम इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होत असतो. या प्रयत्नांचा संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवीनंतरच्या रोजगारासाठीच्या मुलाखतीला सामोरे जाताना विशेष फायदा होतो. याशिवाय या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या उपक्रमांत सहभागी होण्याचे मोठे समाधान संबंधित कर्मचाऱ्यांना लागत असते.

काही कंपन्या तर याच प्रयत्नातील पुढील टप्प्यात छोटी शहरे, जिल्हा स्थाने वा तत्सम ठिकाणच्या विशेषतः इंजिनीअरिंगच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नेहमीच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त प्रत्यक्ष उद्योगांसाठी वा उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक विषयांवर व्याख्यानवजा मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करतात. याकामी कंपन्यांच्या अनुभवी तंत्रज्ञ वा व्यवस्थापकांना प्रोत्साहन दिले जाते व त्यांच्या अनुभवाचा फायदा नव्या विद्यार्थी-पदवीधरांना होतो. याशिवाय प्रत्यक्ष उद्योग-कारखान्याला भेट व चर्चा, अल्पकालीन उमेदवारी, प्रशिक्षण इत्यादी पण या विद्यार्थ्यांना देऊन त्यांचा कौशल्य विकासाचे काम या कंपन्या व त्यांचे कर्मचारी समाधानकारकरीत्या करतात. या उपक्रमाचा फायदा गेल्या आर्थिक वर्षात ६८ हजार विद्यार्थ्यांना झाला, ही आकडेवारी पुरेशी बोलकी ठरते. याच धर्तीवर 'प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल' या कंपनीतर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक उपक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे. या उपक्रमाचा लाभ सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांना झाला आहे. त्यांच्या माध्यमातून शेकडो विद्यार्थ्यांच्या विविध गटांना त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रम व पात्रतेच्या जोडीला त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या भावनिक प्रज्ञाशीलता, सकारात्मक विचार, सहकारी कार्यपद्धती, विश्लेषणपर वृत्ती, व्यावसायिक पत्रव्यवहार, संभाषणकला, स्वतःचा करीअर विकास व त्यासाठी करावयाचे प्रयत्न इत्यादीबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. 'प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल' कंपनीचा हा विद्यार्थी विकास प्रकल्प युवा स्वयंसेवी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर व पहिल्या टप्प्यात महाराष्ट्राशिवाय गोवा, हिमाचल प्रदेश, गुजरात व तामिळनाडू या राज्यांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या 'शैक्षणिक विकास' विषयक प्रयत्नात कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून विशेष विकास विषयक उपक्रम यशस्वीपणे राबविणारी कंपनी म्हणून 'कॅप जेमिनी' कंपनीचा प्राधान्याने उल्लेख करावा लागेल. यासंदर्भात उपलब्ध माहितीनुसार, 'कॅप जेमिनी' कंपनीच्या ९० हजार कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षी आपल्या उत्स्फूर्त प्रयत्नातून २ लाख ४३ हजार तास प्रयत्न करून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी मोठे काम केले. आगामी काळात कंपनी कर्मचाऱ्यांच्या या विशेष उपक्रम प्रयत्नात सुमारे २० टक्क्यांनी वाढ करण्याचा कंपनीचा मानस आहे. या नव्या उपक्रमात नव्याने पदवी वा पदविका उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीसाठी योग्य प्रकारे स्वतःची माहिती मांडणे, मुलाखतीची पूर्वतयारी, मुलाखतीचा सराव, अभिरूप मुलाखत यांसारखे मार्गदर्शन केले जाते हे विशेष.

'स्टॅण्डर्ड चार्टर्ड' बँकेत तर कंपनीच्या धोरणात्मक निर्णयानुसार, बँकेच्या कर्मचाऱ्यांना दरवर्षी तीन दिवसांची विशेष रजा सामाजिक जबाबदारीच्या भूमिकेतून समाजकार्य करण्यासाठी दिली जाते. या दरम्यान कर्मचाऱ्यांना त्यांच्या समाजकार्य प्रकल्पासाठी मार्गदर्शन व गरजेनुरूप साहाय्य केले जाते. या वर्षीपासून 'हिंदुस्थान युनिलिव्हर' कंपनीने सामाजिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय काम सातत्याने करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सामाजिक योगदानाची विशेष नोंद घेत, त्यांच्या यशस्वी प्रयत्नांसाठी त्यांना प्रोत्साहनासह पुरस्कृत करण्याची विशेष योजना आखली आहे. पूर्वी कंपनी स्तरावर समाजसेवा वा सामाजिक कामासाठी केवळ आर्थिक मदत देऊन आपल्या सामाजिक भानाची इतिश्री मानणाऱ्या कंपन्या आज याकामी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन प्रोत्साहन देत आहेत, ही बाब निश्चितच अभिनंदनीय ठरते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वेध

**नितीन शिरसाट**

# शेतकऱ्याच्या आत्महत्येने शासन जागे होईल का?

शेतकरी दिवस-रात्र, उन्ह, वारा, पावसाची तमा न बाळगता कष्ट करून शेतात धान्य पिकवतो. भारत कृषिप्रधान देश असल्याने ऐंशी टक्के लोक शेती व्यवसायाशी निगडित सुपीक जमीन, पाणी आणि मनुष्यबळाचा वापर करीत, आसमानी सुलतानी संकटाचा सामना करून निसर्गाच्या भरवशावर शेतात पिके घेतात. ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, अतिवृष्टीने खरडून गेलेली शेतजमीन शिवाय शेतमालाला हमीभाव नसल्याने अधिक उत्पादन झाले तर कापूस, सोयाबीन यासारख्या नगदी पिकांना मातीमोल किमतीत व्यापारी बाजार समित्यांना विकावे लागते. कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, विवाह अशा आर्थिक विवंचनेत असतानाच बँक, सावकाराकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीने त्रस्त झालेले शेतकरी दररोज आत्महत्या करीत असल्याने शासन-प्रशासकीय यंत्रणा हतबल झाली आहे. केंद्र व राज्य सरकारने शेती विषयक साधने, नवनवीन यंत्र खरेदीसाठी लागणारे कर्ज अनुदान, शिवाय सिंचनासाठी शेततळे, धरणातील पाणी, शेत पीक विमा योजना अशा अनेक सुविधा उपलब्ध करून दिले आहेत. गेल्या पाच वर्षांत अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती नुकसानग्रस्तांचे सर्वेक्षण अहवालानुसार राज्यातील शेतकऱ्यांना चौपन्न कोटी रुपये मदत देण्यात आली आहे. त्यातील साडेसव्वीस कोटी रुपये पीक विमा योजनेतील लाभार्थींना मिळाले आहे. पिकांच्या नुकसानीसाठी राज्य शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून लाभार्थी निधी वापरला आहे. शेती पिकांच्या नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासोबतच आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र व राज्य सरकार दरवर्षी मदत वाढवीत असते. पंतप्रधान पीक विमा योजना तसेच हवामानावर आधारित पिके विमा योजनाद्वारे विमाधारकांना हा लाभ मिळाला आहे. गेल्या सहा वर्षांत राज्यातील २२ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना सिंचन पायाभूत सुविधा सुधारण्यासोबतच हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्याचे धोरण अवलंब करताना प्रशिक्षण देण्यात आले आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास मोहीम डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनांद्वारे विहीर, शेततळे, सिंचन सुविधा आर्थिक मदत दिली आहे. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात मराठवाडा, विदर्भात आघाडीवर असलेल्या धाराशिव येथील शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड करण्यात आघाडी घेतली असून केसर, आंबा, ड्रॅगन फ्रुट, खजूर, द्राक्षे, पेरू असे उत्पादन घेऊन आत्महत्याग्रस्त ही ओळख कायमची पुसली आहे. या योजनेचा लाभ बुलढाणा, जालना जिल्ह्यातील शेतकरी घेताना दिसत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शिवनी अरमाळ (ता. देऊळगाव राजा) येथील उपक्रमशील राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त युवा शेतकरी कैलास नागरे यांनी खडकपूर्णा संतचोखा सागर धरणाचे पाणी कालव्याद्वारे पंचक्रोशीतील चौदा गावांना सोडण्यात यावे या मागणीसाठी आत्महत्या केली, या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण शासन, प्रशासन, मंत्री, लोकप्रतिनिधी, समाजमन ढवळून निघाले. या मागणीसाठी उपोषण आंदोलन करणारा हा शेतकरी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कृतिशील उपक्रम राबवत होता. कौटुंबिक अडचणीवर मात करून व्यसनमुक्तीचे धडे देत सिंचनातून समृद्धीचे स्वप्न उराशी बाळगून शासनाचा पुरस्कार प्राप्त होऊन प्रशासनाशी संघर्ष करीत होता. त्यांनी कष्ट व जिद्दीने शेती कामात स्वतःला झोकून दिले होते. शेतातील पडक्या विहिरीत बोअर घेऊन पपई, केळी यांची फळबाग फुलवली. कोरोना काळात कांदा, लसूण, टरबूज, शेती पिके बांधावर विकली. त्यांची शेती प्रशिक्षण व पर्यटनाच्या दृष्टीने विकसित झाल्याने पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ कृषी संशोधन केंद्राने दखल घेतली. जैविक फार्मर प्रोड्युसर कंपनीची स्थापना केली. या कामासाठी लगतच्या चौदा गावांना खडकपूर्णा धरणाचे पाणी कालव्याद्वारे शिवनी अरमाळ धरणात सोडले तर शेतजमीन सुपीक होईल या मागणीसाठी प्राणांतिक अन्नत्याग आंदोलन केले. प्रशासनाने दखल न घेतल्याने सव्वीस जानेवारी प्रजासत्ताक दिनापासून पुन्हा उपोषणाचा इशारा दिला होता. पालकमंत्री मकरंद पाटील, आमदार मनोज कायंदे यांच्या मदतीने उपोषण मागे घेतले होते. परंतु होळीच्या दिवशी युवा शेतकरी कैलास नागरे यांनी जीवनयात्रा संपवली. शासनाच्या कृषी विभागामार्फत अमरावती विभागातील प्रयोगशील युवा शेतकरी कैलास नागरे यांना शासनाच्या कृषी विभागामार्फत अमरावती विभागातील प्रयोगशील युवा शेतकरी पुरस्काराने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते गौरविण्यात आले होती. त्यांच्या आत्महत्येने शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय लोकप्रतिनिधी आक्रमक झाले. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी तात्काळ बैठक घेऊन या गावांना पाणी वाटपासंदर्भात सकारात्मक चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. यानिमित्ताने कैलासची आत्महत्या सामाजिक, राजकीयदृष्ट्या चिंतनाचा विषय ठरत आहे.

९८८१७१७८२८

### असामाजिक तत्त्वांचा पुरेपूर अभ्यास व्हायलाच हवा!

दिल्लीची दंगल झाल्यानंतर तशाच प्रकारच्या दंगली देशभर होऊ शकतात,



तेव्हा प्रत्येक राज्य सरकारने अशा असामाजिक तत्त्व बाळगणाऱ्या लोकांचा व्यवस्थित अभ्यास करून, जनतेला त्रासदायक, जीवितहानी घडविणाऱ्या त्यांच्या योजना हाणून पाडायला हव्यात. त्यांच्यावर सतत कडक नजर ठेवून, त्यांच्या हालचाली, त्यांची देशद्रोहीवृत्ती यावर घाला घालायला हवा. समाजाचे वेगवेगळ्या माध्यमातून केलेल्या नुकसानाची भरपाई, समाजद्रोह्यांच्या जमीन, जुमला, घर विकून करायला हवी. जेणेकरून पुन्हा जनतेचे किंवा सरकारी मालमत्तेचे नुकसान करताना त्यांना दहावेळा विचार करावा लागेल. गुप्तचर खाते एवढे सक्षम करावे की शहरात घडणाऱ्या प्रत्येक हालचाली व त्यावर घटना घडण्यापूर्वीच अंकुश लावण्याचे कार्य व्हावे. गफलतीत राहून, दुर्लक्ष करणे म्हणजे जनतेच्या जीवाशी खेळणे असे होईल. पोलिस यंत्रणा, त्यातल्या त्यात महिला पोलिस यांच्याशी अभद्र व्यवहार करणाऱ्यांचे, कायद्याने चौरंग होईल अशी स्थिती गुंडांची व्हायला हवी. अशा लोकांच्या ठिकाणांवर छापे घालून, त्यांची सत्यता जनतेसमोर आणायला हवी. धर्माच्या नावावर, देशद्रोह होत असेल तर त्यांना कठोर शिक्षा व्हायलाच हवी असे वाटते.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

### 'चार' शब्दाचा मथितार्थ

'चार' हा शब्द केवळ संख्यादर्शक नाही तर हा शब्दसंस्कारदर्शक, बुद्धिमत्तादर्शक सुद्धा आहे. फक्त या शब्दाशी इतर शब्द कोणते जोडले जातात यावर ही गोष्ट अवलंबून असते. सदाचार, सुविचार हे शब्द आपल्या चांगल्या आचार-विचारांशी संबंधित आहे. तसेच अत्याचार, अविचार, स्वैराचार, व्यभिचार इत्यादी शब्द आपल्या वाईट आचार-विचारांशी संबंधित असतात.

## वाचक पत्रे

काही तथाकथित विचारवंत आपले अविचार कोणताही सुज्ञ विचार न करता प्रस्तुत करतात. आपल्या शेजाऱ्यासंबंधी जेवढे सहजपणे ते वाईट बोलतात, त्यांचे वाईट गुण सांगतात, तेवढ्याच सहजपणे ते राष्ट्रपुरुषांविषयी सुद्धा नको ते कोणताही आधार नसताना सांगतात, बोलतात, लिहितात आणि स्वतःच तोंडघशी पडतात. आपण आपल्या कुटुंबातील लोकांविषयी, मित्रांविषयी जेवढ्या सहजतेने बोलून जातो, तेवढ्या सहजतेने, आपल्या देशाविषयी, राष्ट्रीय पुरुषाविषयी बोललो तर देशभक्त लोक, राष्ट्रपुरुषाचा आदर करणारे लोक ही गोष्ट अजिबात सहन करू शकणार नाही. प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज, जिजामाता इत्यादी महान व्यक्तींविषयी सामान्य व्यक्तीने अगदी सहजपणे बोलू नये. त्यांच्यासंबंधी कोणताही चुकीचा अभिप्राय देऊ नये एवढी तरी सामान्य बुद्धी असणे त्यांच्या चांगल्या मानसिक आरोग्यासाठी सुद्धा आवश्यक आहे. अन्यथा त्यांना आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागेल. भारतीय संविधानाने आपल्याला भाषणाचे स्वातंत्र्य दिले असले तरी राष्ट्रपुरुषांचा, देशातील सन्माननीय व्यक्तींचा, जनतेने निवडून दिलेल्या नेत्यांचा अपमान करून तात्पुरती स्वस्त लोकप्रियता प्राप्त करण्याच्या नादात मर्यादा ओलांडू नये. असे केल्यास देशातील जनता आणि कायदेशीर व्यवस्था त्यांच्यावर कठोर उपचार केल्याशिवाय राहणार नाही.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९९

### स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे

विनोदी कलावंत कुणाल कामराने शिवसेना नेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या विरोधात विडंबन करणारं गाणं म्हटलं. यामुळे आता राज्यात नवा वाद उफाळून आला असून शिवसैनिकांनी त्याच्या स्टुडिओची तोडतोड केली आहे.

कुणाल कामरा हा एक भारतीय विनोदवीर आहे. २०२० मध्ये कामराने अर्णब गोस्वामी यांच्या गैरवर्तन केल्याबद्दल त्याला इंडिगो एअर लाईन्सने तीन महिन्यांसाठी एअर लाईन्स प्रवासासाठी प्रतिबंधित केले होते. याआधीही कुणाल कामराने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली होती. त्याबद्दल लोकांनी त्याला सुनावले होते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याने अनेक गोष्टींची मुभा दिली असली तरी त्याचा वापर करताना विवेक आणि तारतम्य पाळायलाच हवे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, याचे नेहमी भान ठेवायला हवे. कुणाल कामराने त्याचे उल्लंघन सातत्याने केले आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या स्वतंत्र वागण्याचा इतरांवर अनिष्ट आणि विपरीत परिणाम होत तर नाही, याचे भान ठेवायला हवे. कुणाल कामराविरुद्ध कायदेशीर कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे, कारण त्याने अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या सर्व सीमा पार केल्यात आहेत.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**धाराशिव :** येथील मध्यवर्ती बसस्थानकाच्या बांधकामाची पाहणी करून काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. धारशिवकरांना लवकरच सुसज्ज असं नवीन बसस्थानक मिळणार असून, यामुळे प्रवाश्यांची गैरसोय दूर होणार आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### दिव्यांगांच्या खात्यावर निधी जमा करा

**परंडा, दि.२५ मार्च -**



परंडा येथील नगरपरिषद कार्यालयाने दिव्यांग पाच टक्के निधी रमजान ईद व गुढीपाडवा या सणापूर्वी दिव्यांगाच्या खात्यावर पाच टक्के निधी तात्काळ वितरित करावा असे लेखी निवेदन दिव्यांग उद्योग समूह परंडा शहराध्यक्ष गोरख देशमाने यांनी नगरपरिषद कार्यालय येथे लेखी निवेदन सादर केले निवेदनात पुढे म्हटले आहे की परंडा शहरातील नगरपरिषद कार्यालय मार्फत दरवर्षी पाच टक्के दिव्यांग निधी नगरपरिषद कार्यालय शासनाच्या नियमानुसार दिव्यांगाच्या खात्यावर निधी वितरित केला जातो परंतु यावर्षी रमजान ईद व गुढीपाडवा हे दोन्ही सण चार ते पाच दिवसावर आलेले आहेत या सणाच्या अगोदर दिव्यांगाच्या खात्यावर पाच टक्के निधी नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ वितरित करावा असे लेखी निवेदनात म्हटले आहे हे लेकी निवेदन माहितीस्तव जिल्हाधिकारी साहेब जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव माहितीस्तव सादर केले.

### जनावरांची वाहतूक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**लोहारा, दि.२५ मार्च -**



प्राण्यांना निर्दयपणे वागणूक देत बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध लोहारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपी सय्यद अंजीर जानुमिया (वय ३०, रा. माकणी, ता. लोहारा, जि. धाराशिव) हा २३ मार्च रोजी दुपारी १:३० वाजता छोटा हत्ती (वाहन क्र. चक ४२ च् ६४१२) मधून दोन गोवंशीय बैलांची बेकायदेशीर वाहतूक करताना आढळला. या बैलांची किंमत अंदाजे ९० हजार रूपये असून, त्यांना कोणत्याही प्रकारच्या चारापाण्याची व्यवस्था न करता निर्दयपणे कत्तलीसाठी घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. लोहारा पोलिसांनी कारवाई करत सदर वाहनासह एकूण २ लाख ४० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी आरोपीवर प्राण्यांस क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत कलम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मोटरसायकलमध्ये हवा भरण्यावरून वाद

**धाराशिव, दि.२५ मार्च -**



मोटरसायकलमध्ये हवा भरण्याच्या कारणावरून झालेल्या वादात दोघांनी एका व्यक्तीस चाकूने मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली. विशाल उर्फ पप्पु सुरेंद्र धालगडे आणि शाहीन उर्फ चॉद अली सय्यद (दोघे रा. कडकनाथवाडी, ता. वाशी) यांनी शब्बीर नसीर शेख (रा. येरमाळा) यांना शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी तसेच चाकूने मारहाण केली. यामध्ये फिर्यादी गंभीर जखमी झाले असून, आरोपींनी त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी शेख यांनी दिलेल्या तक्रारीनुसार येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तुळजापूरातील सार्वजनिक ठिकाणे बनले नशिड्यांचे अड्डे

**संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेल्या ड्रग्स प्रकरणामुळे व्यसनाधींच्या अड्ड्यांवर रात्रीच्या वेळी पोलीस पेट्रोलिंगच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी...**



मंडई...



बाजार कट्टा...



नविन बस स्थानक...

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२५ मार्च -**

संपूर्ण महाराष्ट्रात कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेचे तीर्थक्षेत्र ड्रग्समुळे बदनाम झाले असून शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणी व्यसन करणाऱ्या दारुड्यांच्या ओल्या पार्ट्या अंधाराचा फायदा घेऊन खुलेआम चालू असतात.

शहरात ड्रग्स तस्करी प्रकरणामुळे नागरिक भयभीत झाली असून पालक वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे. अशातच शहरात अनेक सार्वजनिक ठिकाणी नशिलेगंजडी दारुड्यांच्या ओल्या पार्ट्या अंधाराचा फायदा घेऊन खुलेआम चालू असतात. आशा दारुड्यांवर पोलीस प्रशासनाने अंकुश आणल्याशिवाय शहरातील ड्रग्स माफियांवर देखील वचक निर्माण होणार नाही, अशी चर्चा नागरिक करत आहेत.

आठवडा बाजार, हेलीपॅड, पापनास तीर्थकुंड, धाराशिव, लातूर बायपास रोडच्या कडेला, जुन्या बस स्टँडच्या पाठीमागील भाजी मंडईत व्यसनींची थवेच्या थवे बसलेले असतात. शहरात मध्यवर्ती असणारे ठिकाण म्हणजे आठवडा बाजार या ठिकाणी रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेत दारुड्यांच्या दारूच्या पार्ट्या मोठ्या प्रमाणात उघड उघड चालतात.

याकडे देखील पोलीस प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे या भागात रोड लाईट नाही याचाच फायदा घेऊन शहरातील समाजकंटक लोक दारूच्या बाटल्या घेऊन ओल्या पार्ट्या करतात. या भागात ठिकठिकाणी दारू पिणाऱ्याचे टोळकेच्या टोळके बसलेले असतात.

या टोळक्यांच्या धिंगाम स्तीला या भागातील रहिवाशी वैतागले आहेत सकाळी दारूच्या बाटल्यांच्या फुटलेल्या काचा सर्वत्र पडलेल्या दिसतात. सकाळी म ॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांना चोहीकडे फुटलेल्या दारूच्या बाटल्या दिसतात.

शहरातील या सर्व भागात पोलीस प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. त्याचप्रमाणे शहरातील या सर्व भागात उघड्यावर मध्य पिणाऱ्या लोकांची संख्या चांगलीच वाढलेली आहे.

सार्वजनिक भागात दारूच्या बाटल्या घेऊन मोठ्या संख्येने ओल्या पार्ट्यांचा उत सध्या तुळजापूर मध्ये आला असून ड्रग सारखे गंभीर प्रकरण गाजत असताना अशा सार्वजनिक ठिकाणी दारुड्यांच्या होत असलेल्या पार्ट्यांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन कोणते ठोस पावले उचलणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

तामलवाडी येथे ड्रग्स तस्करी करताना पकडलेल्या तीन आरोपीम ुळे तुळजापूर शहराचे मुंबई ड्रग्स कनेक्शन असल्याचे समोर आले. पोलीस यंत्रणेने तपास चक्र फिरवून ड्रग्स तस्करीचा पडदा फ्लॅश करत आत्तापर्यंत ड्रग्स तस्करीत १९ आरोपींना शोधून काढण्यात पोलिसांना यश आले आहे. चार नावे पोलिसांनी गोपनीय ठेवली आहेत. ते चार नावे पोलीस डायरीत नमूद करून न्यायालयाकडे देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. पोलिसांनी गोपनीय ठेवलेल्या चार नावाबद्दल मात्र शहरात उलट सुलट चर्चेला उधान आले आहे.

जो तो प्रत्येकाकडे संशयाच्या नजरेने बघत असून जोपर्यंत हे चार नाव उघड होत नाहीत तोपर्यंत शहरात चाललेल्या उलट सुलट चर्चेला पूर्णविराम लागणार नाही हे निश्चित आहे.

**शहरातील सार्वजनिक ठिकाणी तरुणांचे टोळकेच्या टोळके...**

सार्वजनिक ठिकाणी खुलेआम दारुड्यांच्या होणाऱ्या पार्ट्यांवर आळा आणण्यासाठी पोलीस प्रशासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे असल्याची चर्चा संपूर्ण शहरात सुरू झाली आहे.दारुड्यांच्या पार्ट्यांच्या आडून ड्रग्स विक्री आणि व्यसनची शक्यता देखील नाकारता येऊ शकत नाही. सार्वजनिक ठिकाणी तरुणांचे टोलकेच्या टोळके आढळून येत आहेत. पोलीस प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी गस्त वाढवणे आवश्यक असल्याचे मत देखील जाणकारातून व्यक्त होत आहेत.

## प्रशिक घेणार नवोदयमध्ये शिक्षण


**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२५ मार्च -**



येथील प्रशिक सुमेध वाघमारे हा याने नुकतेच झालेल्या नवोदय विद्यालय येथील प्रवेश परीक्षा मध्ये यश मिळवले असून तो नवोदय विद्यालय साठी पात्र ठरला आहे.

तालुक्यातील हिंगळजवाडी येथील आयडियल इंग्लिशस्कूल मधील इयत्ता पाचवी मध्ये शिकत असलेला प्रशिक वाघमारे यांनी नुकतेच नवोदय विद्यालय प्रवेश पात्र परीक्षा उत्तीर्ण झाला असून तो सहवी साठी प्रवेश पात्र ठरला आहे. संस्थाध्यक्ष अनिल देशमुख, प्राचार्य वैशाली आडसूळ, सहशिक्षक मीनाक्षी लोमटे, उमा कोथिंबीर, राजकन्या नाडे, ज्ञानदा घुटुकडे, भाग्यश्री खोडवे, सारिका मुळे, शुभांगी घेवारे, नंदिनी शिंदे यांनी अभिनंदन केले.

# गाय गोठ्याचे अनुदान रखडले; अनुदानासाठी शेतकऱ्यांची पायपीट




**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.२५ मार्च -**

ग्रामीण भागात शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात करतात आहेत. दुग्ध व्यवसायातून मि ळालेल्या पैशातून शेतकऱ्यांचा आठवडाभर वरखर्च भागतो परंतु मागील काही दिवसांपासून दुधाचे दर कमी झाल्याने आलेले पैसे खर्चातच जातात. त्यामुळे दुग्ध व्यवसाय मोडकळीस आला आहे.

त्यात शासनाने राज्यात शेतकऱ्यांसाठी गाई म्हैस गोठा महत्वाची योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत गोठा बांधण्यासाठी गाई म्हशीच्या संख्येनुसार शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते. शासनाकडून आर्थिक मदत मि ळाल्यामुळे शेतकरी मजबूत गोठ्याची बांधणी करत आहेत. मात्र ते अनुदान मागील अनेक वर्षे झाली रखडले आहे.

वाशी तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी देखील या योजनेत अर्ज करून गोठा बांधणी केली आहे. तात्काळ अनुदान मिळेल अशेने शेतकऱ्यांनी पहिल्यांदा स्वतःच्या खिशातले पैसे गोठा बांधण्यासाठी खर्च केले.

तर ज्या शेतकऱ्यांकडे पैसे नाही त्या शेतकऱ्यांनी गोठा बांधण्यासाठी लागणारे साहित्य दुकानदारांकडून उद्धार पादर घेऊन गोठ्याची बांधणी केली. आज पैसे येतील उद्याल पैसे येतील म्हणत आता जवळपास दोन ते तीन वर्षे झाली शेतकऱ्यांचे पैसे आणखी जमा झाले नाहीत. गोठ्याचे बिल कधी काढता साहेब म्हणत लाभार्थ्यांना दररोज वाशी पंचायत समिती कार्यालयाच्या पायऱ्या झीजवाव्या लागत आहेत. शेतकऱ्यांनी विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांकडून बजेट उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे.

मग निधी उपलब्ध नाही तर बिन पैशाची योजना सुरू करून शेतकऱ्यांची थट्टा का लावली अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून व्यक्त केली जात आहे. आता बजेट कधी येणार आणि शेतकऱ्यांना अनुदान कधी मिळणार असा सवाल लाभार्थी विचारात आहेत. तर दुसरी गंभीर बाबत म्हणजे गाय गोठा योजनेतील अनेक लाभार्थ्यांच्या फाईल देखील गहाळ झाल्याचा प्रकार समोर आला आहे. लाभार्थ्यांनी पंचायत समिती कार्यालयात फाईल कोठे आहे विचारणा केली असता फाईल सापडत नसल्याचे सांगितले जाते. आता वरिष्ठ अधिकारी गहाळ झालेल्या फाईल प्रकारावर कशी नजर टाकतात हे पाहणे गरजेचे आहे.

तर गोठा बांधणीसाठी उधारीवर घेतलेल्या साहित्याचे पैसे दुकानदार शेतकऱ्यांना मागत असल्याने आता शेतकऱ्यांना खाजगी सावकाराकडून व्याजाने पैसे घेतल्याशिवाय पर्याय नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. शासनाने आता लवकरात लवकर बजेट उपलब्ध करून अनुदान वाटप करावे अशी मागणी लाभार्थी करत आहेत.

## स्कूलबसच्या धडकेत ९० वर्षीय वृद्धाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मार्च -**

कोळेवाडी येथे रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ९० वर्षीय वृद्धाला स्कूलबसची जोरदार धडक बसून त्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, विठ्ठल आबाजी चव्हाण (वय ९०, रा. कोळेवाडी) हे २० मार्च २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता ग्यानदेव सर्जे यांच्या घरासमोर रस्त्यालगत उभे होते. यावेळी स्कूलबस (क्र. चक २५ ५५८१) च्या चालकाने बस हायस्पीड व निष्काळजीपणे चालवून त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात विठ्ठल चव्हाण गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मयताच्या मुलाने, शहाजी चव्हाण यांनी फिर्याद दिली असून, ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**शिवाजी महाविद्यालयात पाणी परिषद कार्यशाळेस ३६ गावच्या सरपंचाचा सहभाग...**

# जलसंवर्धनासाठी ग्रामस्थांचा सहभाग महत्त्वाचा : प्रा. सुरेश बिराजदार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ मार्च -**

वाढते काँक्रिटीकरण आणि जलसंवर्धनाच्या अभावामुळे सध्या पाण्याची समस्या गंभीर बनली असून शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सर्वत्र जाणवतो. यातून बाहेर पडायचे असेल तर जल संवर्धनाबरोबर पाण्याचे योग्य नियोजन होणे गरजेचे आहे आणि हे काम ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाशिवाय शक्य होणार नाही, असे मत सुरेश बिराजदार यांनी व्यक्त केले. ते श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सरपंच पाणी परिषद आणि कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते.

येथील श्री छत्रपती शिवाजी म हाविद्यालयात आंतरराष्ट्रीय जल दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या आयक्यूएसी जलसाक्षरता विभाग रोटरी क्लब उमरगा रोटरी क्लब किल्लारी भूजल सर्वेक्षण विभाग छत्रपती शिवाजी बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने उमरगा-लोहारा तालुका सरपंच पाणी परिषद आणि कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत छत्तीस गावातील सरपंचांनी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी सहभाग घेतला. यावेळी बोलताना मा. सुरेश बिराजदार यांनी जिल्ह्यातील जल संवर्धनाच्या काम ाबद्दल माहिती दिली. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात धाराशिव येथील डॉ. नितीन पाटील यांनी पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत, पाण्याचे योग्य नियोजन, शेतीसाठी आणि पिण्यासाठी दिवसाकाठी लागणारे पाणी याची शास्त्रीय मांडणी करून जल संवर्धन कसे करावे यांनी सविस्तर माहिती उपस्थित सरपंचांना दिली.

दुसऱ्या सत्रात शहरातील प्रसिद्ध डॉक्टर दीपक पोफळे यांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून राज्यभरात जल संवर्धनासाठी केलेल्या कार्याची माहिती पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे दिली. २०१२ ते २०१६ या दरम्यान दुष्काळी परिस्थितीत ही जलसंवर्धनची कामे फायदेशीर ठरल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी विभागीय स्पर्धेत पारितोषिक प्राप्त जकेकुरवाडीचे सरपंच अमर सूर्यवंशी आणि ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी नायब तहसीलदार सचिन बिराजदार, जुगल किशोर खंडेलवाल, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ.पी.ए. पीटले, उपप्राचार्य प्रा.जी.एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, डॉ. एस.एम. सुरवसे आदींची उपस्थिती होती. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. विनोद देवरकर, प्रास्ताविक डॉ. अस्वले यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ.एस.एम. सुरवसे यांनी मानले.

# बर्ड फ्लू रोखण्यात आरोग्य विभाग अपयशी; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**

जिल्ह्यात दिवसेंदिवस बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव वाढत असून, आरोग्य विभाग त्यावर नियंत्रण मिळवण्यात अपयशी ठरत आहे. यामुळे पोल्ट्री व्यवसायिक, शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे रोगाचा प्रसार अधिक गतीने होत असल्याची स्थानिक नागरिकांची तक्रार आहे.

गेल्या काही महिन्याभरापासून जिल्ह्यात विविध ठिकाणी पक्षांचे मोठ्या प्रमाणावर मृत्यू होत असल्याचे आढळून आले. प्रयोगशाळेत तपासणी केल्यानंतर याला बर्ड फ्लू जबाबदार असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, आरोग्य विभाग आणि पशुसंवर्धन विभागाने वेळीच आवश्यक ती उपाययोजना न केल्याने रोगाचा फैलाव झपाट्याने वाढला आहे. बर्ड फ्लूवर नियंत्रण मिळवण्यासाठी संक्रमित पक्ष्यांना नष्ट करणे, संक्रमित भाग सील करणे, पोल्ट्री फार्मवर कडक निर्जंतुकीकरण करणे आणि नागरिकांम ध्ये जनजागृती करणे आवश्यक असते. मात्र, जिल्हा प्रशासनाच्या उपाययोजना अत्यंत मर्यादित राहिल्या आहेत. बाधित भागातील पोल्ट्री फार्मम धील पक्षी नष्ट करण्याची कारवाई संथ गतीने सुरू आहे, तर स्थानिक स्तरावर पुरेशी जनजागृतीही करण्यात आलेली नाही. बर्ड फ्लूमुळे पोल्ट्री व्यावसायिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.



हजारो पक्ष्यांचे मृत्यू झाल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पोल्ट्री उत्पादने विकत घेण्यास नागरिक टाळाटाळ करत असल्याने विक्रीतही घट झाली आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. या परिस्थितीवर पशुसंवर्धन प्रशासनाच्या हलगर्जीपणावर टीका केली आहे. बर्ड फ्लू रोखण्यासाठी तातडीने कठोर उपाययोजना लागू करण्याची गरज आहे. विलंब झाला, तर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पोल्ट्री व्यवसाय उद्ध्वस्त होऊ शकतो.

दरम्यान, आरोग्य विभागाने मात्र परिस्थिती नियंत्रणात असल्याचा दावा केला आहे. आम्ही बाधित भागात तपासणी मोहीम राबवत आहोत आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू आहेत, असे आरोग्य अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मात्र, जमिनीवरील परिस्थिती पाहता, हे दावे फोल ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

बर्ड फ्लूचा परिणाम केवळ पोल्ट्री उद्योगावरच नाही, तर स्थानिक नागरिकांच्याही आरोग्यावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही आरोग्य तज्ज्ञांनी सतर्कतेचा इशारा दिला असून, संसर्ग रोखण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाने वेळीच योग्य ती पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

**आरोग्य आणि पशुसंवर्धन विभाग मार्च एंडमध्ये गुंतला...**

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बर्ड फ्लू प्रादुर्भाव असताना आरोग्य विभाग आणि पशुसंवर्धन विभाग हे मार्च यांचे बिले काढण्यात आणि त्यातून मिळणाऱ्या मलईमध्ये मग नसल्याचे दिसून येते. मात्र बर्ड फ्लूमुळे त्रस्त असणारे पोल्ट्री व्यवसायिक आणि नागरिक यांना कोणताही दिलासा मिळत नसल्याचे दिसून येत आहे.

## हनुमान मंदिर मूर्तिप्रतिष्ठापनानिमित्त वरवंटी येथे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ मार्च -**



तालुक्यातील वरवंटी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिर मूर्तिप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळ्यानिमित्त वरवंटी येथे हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन ३ ते १० एप्रिल या कालावधीत करण्यात आलेले आहे. या सोहळ्यात नामवंत कीर्तन व प्रवचनकारांची सेवा होणार आहे. सप्ताहाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन वरवंटी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

हभप ॲड. पांडुरंग लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या सप्ताह कालावधीत सकाळी काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, दुपारी महिला हरिभजन, सायंकाळी हरिपाठ, रात्री हरिकीर्तन, हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत.

सप्ताहासाठी वरवंटी ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. या सप्ताहाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अनुदानासाठी शिक्षकांचे प्रतिकात्मक आत्मदहन आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**

अंशत: अनुदानीत प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांना शासनाने अनुदान देण्याबाबत शासन निर्णय काढला होता परंतु अद्याप याबाबत अंमलबजावणी न झाल्यामुळे हजारो शिक्षकांवर अन्याय होत आहे. राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी दि २५ मार्च पर्यंत अंशत: अनुदानीत शाळांना नियमाप्रमाणे अनुदान न दिल्यामुळे दि २५ मार्च रोजी शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करीत प्रतिकात्मक आत्मदहन आंदोलन करीत शासनाला इशारा दिला आहे. तर मुंबई येथील आझाद मैदानावर शिक्षकांनी दि ५ मार्च पासून आक्रोश आंदोलन सुरू केले आहे. यावेळी काही महिलांनी मागण्यांसाठी अंगावर रॉकेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्नही केला आहे. शासन निर्णयाची अंमलबजावणी करीत नसल्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

मंगळवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अंशत: अनुदानीत शाळांमधील शिक्षकांच्यावतीने निदर्शने करण्यात आली. यावेळी दिलेल्या निवेदनात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रीमंडळाने १० आक्टोबर २०२४ च्या बैठकीच्या मान्यतेने दि १४ आक्टोबर २०२४ चा शासन निर्णय काढला. एकूण ५२ हजार पात्र पदांना शासन निर्णयात हेडनिहाय अनिवार्य खर्च म्हणून नागपूर येथील डिसेंबर २०२४ च्या पुरवणी अर्थसंकल्पात तरतुद होणे अपेक्षित होते परंतु शिक्षण खात्याला पूर्णवेळ मंत्री उपलब्ध न झाल्याने या विषयाची पुरवणी मागणी मंजूर झाली नाही अशा प्रकारचे असंविधानिक उत्तर शिक्षकांना देण्यात आले. शिक्षकांना २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात या मागण्या मंजूर होतील अशी अपेक्षा होती. परंतु शासन निर्णयातील पदांना टप्पा वाढीसाठी अपेक्षित तरतुद या शासनाने न केल्याने राज्यातील शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. परिणामी अनेक शिक्षक नैराश्याच्या गर्तेत जाऊन आत्महत्या करीत आहेत. ज्या शाळा २० टक्क्यावर आहेत त्यांना ४० टक्के, ज्या ४० वर आहेत त्यांना ६० टक्के, ज्या ६० वर आहेत त्यांना ८० टक्के असे टप्पे अनुदान देण्याचे शासनाने मान्य केले परंतु त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी न झाल्यामुळे शिक्षकांचा शासनावरील विश्वास उडाला आहे. यासाठी केवळ शासनाला ८२६ कोटींची तरतुद करावी लागणार आहे. शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी अंशत: अनुदानीत शिक्षकांच्या मागण्या मंजुर न केल्यामुळे शिक्षक समन्वय संघाकडून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रतिकात्मक आत्मदहन आंदोलन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी यांचेमार्फत मुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री, अर्थमंत्री यांना निवेदन पाठवण्यात आले. या निवेदनावर ए एम इंगळे, एम टी गलंडे, पी वाय पतंगे, डी व्ही शिराळे, एन ए काळे, व्ही बी अंभोरे, एस व्ही काळे, डी एस इंगळे, एस एस मोरे, एस के राऊत, एस एम डुकरे, एस ई पांचाळ, पी बी राठोड, आर पी वानखेडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ईपीएस-९५ पेन्शन धारकांना दरमहा ७ हजार ५०० देण्यासाठी आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**

केंद्र सरकारच्या सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या ईपीएस ९५ पेन्शन धारकांना दरमहा ७ हजार ५०० रूपये पेन्शन देण्याची मागणी संघटनेच्यावतीने करण्यात आली असून या मागणीसाठी मंगळवार दि २५ रोजी ईपीएस९५ च्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

मागील अनेक वर्षापासून ईपीएस ९५ या पेन्शन धारकांकडून पेन्शन वाढविण्याची मागणी होत आहे. सध्या या पेन्शन धारकांना ११७० रूपये दरमहा मिळत असून सध्याची महागाई पाहता ही रक्कम अतिशय तोकडी आहे. अनेक वर्षे काम करून पेन्शन तोकडी मिळत असल्यामुळे या कर्मचाऱ्यांना वृध्दापकाळात आरोग्यावर उपचारासाठीही अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच उदरनिर्वाहासाठी ते आजही संघर्ष करीत आहेत. महागाई दरानुसार ईपीएस ९५ पेन्शन धारकांना दरमहा पेन्शनमध्ये वाढ करावी यासाठी संघटनेने केंद्र व राज्य सरकारांना अनेकवेळा निवेदने दिली. तसेच आंदोलने केली आहेत. परंतु या वृध्द पेन्शन धारकांना अद्याप न्याय मिळाला नाही. सर्वोच्च न्यायालयाने ईपीएस ९५ धारकांना पेन्शन वाढवून देण्याचे आदेश दिले असतांनाही शासन याबाबत गंभीर नसल्यामुळे या वृध्द ईपीएस धारकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. दैनंदिन जीवनात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबींचा शासनाने विचार करावा अशी मागणी करीत ईपीएस ९५ संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

ईपीएस पेन्शन धारकांना दरमहा ७५०० रूपये तसेच महागाई भत्ता, पती-पत्नी यांना मोफत आरोग्य सुविधा मिळाव्यात अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. यावेळी आंदोलनात रत्नाकर कुलकर्णी, दासराव कातोरे, सुभाष अपूर्वा, डी एम कल्याणकर, जी टी किर्तनकार, डी एन करेवार, विश्वनाथ टेकाळे यांच्यासह ईपीएस ९५ चे पेन्शनधारक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# हिंगोलीत रोजगार मेळाव्यात १०६ उमेदवारांची प्राथमिक निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर व शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच येथील शिवाजी महाविद्यालयात पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा व पदवी तसेच पदवीधारक या पात्रतेच्या २४८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १०६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे. या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील विविध नामांकित कंपनीचे उद्योजक उपस्थित होते. तसेच जिल्ह्यात विविध महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देण्यासाठी विविध महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले होते. या मेळाव्यात मार्गदर्शन करताना शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य क्षीरसागर यांनी चांगल्या ठिकाणी आत्मविश्वासाने मुलाखत द्यावी व आपल्यातल्या सूप्त गुणांना वाव द्यावा, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सहायक आयुक्त डॉ. रा.प्र.कोल्हे यांनी रोजगार मेळाव्याचा हेतू विशद करताना म्हणाले, युवकांनी बेकार बसून दीड जीबीचा डाटा खर्च करण्यापेक्षा मिळेल ती कामे स्वीकारावीत. या संधीतून मिळालेल्या कामाचा अनुभव पुढील संधीसाठी उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे युवकांनी मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवून रोजगार प्राप्त करुन घ्यावा, असे आवाहन केले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री. बोथीकर यांनी कंपनीमध्ये मिळणाऱ्या पगाराचा विचार न करता आपल्याला अनुभव कसा मिळेल यासाठी प्रयत्न करावा, असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. शिराळे यांनी केले. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता हिंगोली या कार्यालयाचे नवनाथ टोनपे, मनोज लोखंडे, महेश राऊत, राजाभाऊ कदम, नागेश निरदुडे, रमेश जाधव, पवन पांडे, अमोल आडे, अभिजीत अलोने आणि शिवाजी महाविद्यालयाचे प्राध्यापक व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




**हिंगोली- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट आरोग्य सेवा दिल्याबद्दल डॉ कोमल मारोतीराव एंगडे यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस, डॉ देवेंद्र जायभाये आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पौष्टीक तृणधान्य कृषी महोत्सवाचे आयोजन

हिंगोली- जिल्ह्यातील शेतकरी व जनतेस पौष्टीक तृणधान्य पिकांचे महत्व पटवून देण्यासाठी कृषि विद्यापीठातील तसेच कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर येथील तज्ञ, आहार तज्ञ, प्रगतशील शेतकरी व पौष्टीक तृणधान्य उत्पादक व त्याचे पदार्थ तयार करणारे बचत गट यांच्या समावेशाने येथील महावीर भवनामध्ये बुधवार, दि. २६ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११ ते सायं. ६ वाजेपर्यंत हिंगोली, सेनगाव व कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी एक दिवशीय जिल्हास्तरीय महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. तसेच वसमत व औंढा नागनाथ येथील शेतकऱ्यांसाठी वसमत येथील प्रसाद मंगल कार्यालयामध्ये गुरुवार, दि. २७ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११ ते सायं. ६ वाजेपर्यंत एक दिवशीय जिल्हास्तरीय महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. या महोत्सवामध्ये पौष्टीक तृणधान्य या विषयामध्ये काम केलेल्या तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. पौष्टीक तृणधान्याचे पदार्थ तयार केलेल्या बचत गटांचे आणि उत्पादक शेतकऱ्यांचे महोत्सव स्थळी स्टॉल लावण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील सर्व शेतकरी व जनतेने या महोत्सवात उपस्थित राहून पौष्टीक तृणधान्य पिकांचे महत्व समजावून घेण्याचे आवाहन राजेंद्र कदम, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वर्ष प्रतिपदा उत्सव

हिंगोली- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंगोली शहर चा वर्ष प्रतिपदा उत्सव रविवार दिनांक ३० मार्च २०२५ चैत्र शुक्ल प्रतिपदा ला सायंकाळी ५.३० मिनिटानी शहरातील तापडिया इस्टेट वसाहतीतील महावीर उद्यान येथे साजरा होणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उत्सवपैकी वर्ष प्रतिपदा चैत्र शुक्ल प्रतिपदा (गुडी पाडवा) हा हिंदू नववार्षाचा पहिला उत्सव या दिवशी हा उत्सव मोठ्या प्रमाणात संपूर्ण हिंगोली जिल्यात साजरा केल्या जातो. या दिवशी संघाचे आद्य सर संघचालक माननीय श्री डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांना आद्य सर संघचालक प्रणाम ही दिल्या जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील दायित्ववान स्वयंसेवक यांना नवीन वर्षात नवीन दायित्व दिल्या जाते. आणि स्वयंसेवक हे दायित्व प्रामाणिक पणे निभाविन्याचे संकल्प करतो. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गजानन पोपलाईत उपस्थित राहणार असून प्रमुख वक्ते श्री उपेंद्र कौडगांवकर यांचे बौद्धिक होणार आहे. कार्यक्रम वेळेवर होणार असून स्वयंसेवकांनी गणवेश धारण करून यावे तसेच शहरातील नागरिकांनीही उपस्थित राहावे.

### ६६ वाहन चालकांवर पोलिसांची कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६६ वाहन चालकाविरूध्द जिल्ह्यात विविध ठिकाणी पोलिस विभागाच्यावतीने कार्यवाही करण्यात आली. यावेळी त्यांच्याकडून ५२ हजार २५० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यात दारूबंदी कायद्यांतर्गत पोलिस विभागने चार ठिकाणी छापे मारीत ६ हजार ८० रूपयांचा किंमतीचा मुद्देमाल जप्त करीत अवैध दारूविक्री करणाऱ्यांविरोधात कार्यवाही केली आहे. तसेच तीन ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापा टाकून ४२६० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# कुणाल कामरावर कारवाई करून त्यामागील ‘आका’ चा शोध घ्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अतिशय खालच्या पातळीवर जाऊन गाणे बनवणाऱ्या कुणाला कामरावर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी येथील युवा सेनेच्यावतीने मंगळवार दि २५ मार्च रोजी कामरा यांच्या प्रतिकात्मक पूतळ्याचे दहन करण्यात आले.

स्टँडअप कॉमेडीयन कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अतिशय खालच्या पातळीवर जाऊन गाणे गायले. या गाण्यामुळे राज्यभरात मोठा वाद सुरू झाला आहे. ठिकठिकाणी कामरा यांच्यावर टिकेची झोड उठू लागली असून गुन्हे दाखल करण्याची मागणी शिवसैनिकांकडून होत आहे. हिंगोली येथे मंगळवारी युवा सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामरा यांच्या प्रतिकात्मक पूतळ्याचे दहन केले. यावेळी माजी नगरसेवक श्रीराम बांगर, युवा जिल्हा प्रमुख राम कदम, मराठवाडा निरीक्षक विपूल पिंगळे, मयुर शिंदे, लखन शिंदे, विशाल देशमुख, रवि शिंदे, अक्षय ढगे, सचिन पेंढारकर, संतोश गोरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पूतळा दहनानंतर पदाधिकाऱ्यांनी शहर पोलिसांना निवेदन सादर केले. त्यामध्ये कामराच्या कृत्यामुळे शिवसैनिकांच्या भावना दुखावल्या असून यापूर्वीही त्यांनी विनोदाच्या नावाखाली खालच्या पातळीवर जाऊन टिका केली आहे. त्यातून राज्यात अशांतता पसरविण्याचे काम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात कामरा यांच्यावर गुन्हा दाखल करून त्याना अशा प्रकारचे विनोद करण्यासाठी कोण पाठबळ देत आहे त्या आका चा शोध घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# आजपासून नर्सी नामदेवमध्ये ६ दिवस धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**

श्री संत नामदेव यांचे जन्मस्थळ नर्सी येथे बुधवार दि २६ मार्च पासून तीन दिवशीय धार्मिक कार्यक्रमांना सुरूवात होणार आहे. यावेळी परिसरातील वारकऱ्यांच्या सुमारे ६० दिंड्या दाखल होणार आहेत.

संत नामदेव महाराजांचे जन्मस्थह असलेल्या नर्सी नामदेव येथे मीठाची यात्रा प्रसिध्द होती. धान्याच्या बदल्यात मीठ हे या यात्रेचे वैशिष्ट्य होते. पापमोचणी एकादशीला सुरूवात झालेली मीठाची यात्रा पंधरा दिवस चालत होती. यामध्ये गुजरात तर बाहेर राज्यातून मीठ विक्रीसाठी आणले जात होते. तर परिसरातील शेतकरी, गावकरी, भाविक बैलगाडीने यात्रेला येऊन धान्याच्या बदल्यात वर्षभर पुरेल एवढे मीठ खरेदी करीत होते. रस्ते खराब व वाहने नसल्यामुळे बैलगाडीतून आलेले भाविक मीठाची खरेदी करीत होते. मात्र मागील काही वर्षात सर्वत्र मीठाची उपलब्धता तसेच वाहतुकीची सोय झाल्यामुळे ही यात्रा लोप पावत चालली आहे.

मात्र संस्थानची तीन दिवसीय धार्मिक यात्रा सुरू आहे. बुधवार दि २६ मार्चला सकाळी ७ वाजता महापूजा होणार असून त्यानंतर सकाळी ११ वाजता पोलिस ठाण्याच्यावतीने सहायक पोलिस निरीक्षक बद्रीनाथ सानप यांच्याहस्ते पूजा करण्यात येणार आहे. यावेळी संत नामदेव महाराज यांच्या समाधीसमोर आहेर केला जाणार आहे. यावेळी संस्थानचे उपाध्यक्ष भिकाजी किर्तनकार, विश्वस्त मनोज आखरे, द्वारकादास सारडा, भागवत सोळंके, रमेश महाराज मगर यांच्यासह विश्वस्त व भाविक उपस्थित राहतील.

दरम्यान सकाळपासूनच भाविकांची दर्शनासाठी गर्दी होणार असल्यामुळे चोख व्यवस्था करण्यात आली आहे. कडक उन्हाची तीव्रता पाहता भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या यात्रेला परिसरातील सुमारे ६० गावांतील दिंड्या तसेच भाविकांसह जिल्हा व बाहेर जिल्ह्यातील भाविक दर्शनासाठी दरवर्षी येत असतात. त्यानंतर गुरूवारी ग्राम प्रदक्षिणा, सायंकाळ किर्तन होणार आहे. त्यानंतर शुक्रवार दि २८ मार्च रोजी काल्याच्या किर्तनाने यात्रेची सांगता होणार आहे. भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# थकबाकीदारांचे नळ कनेक्शन खंडीत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**

मागील पाच ते सहा वर्षांपासून नळपट्टी थकीत असल्यामुळे नगर परिषद हिंगोली कार्यालयाच्या विशेष पाणीपट्टी वसुली पथकाकडून शहरातील श्रीनगर, रिसाला, मस्तानशाह नगर, बावनखोली,पेन्शनपुरा या भागातील एकूण १० थकबाकीदारांचे नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई करण्यात आली आहे. नगर परिषद हिंगोली कार्यालयाने चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता व पाणीपट्टीचे १००% वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या आदेशानुसार विशेष पाणीपट्टी वसुली पथक तयार करण्यात आले असून सदरील पथकाकडून नळ जोडणी खंडित करण्याची कारवाई सुरु आहे. नगर परिषद कर विभागाकडून पाणीपट्टी थकीत असणाऱ्या मालमत्ता धारकांना मागणी नोटीस देऊन तसेच वारंवार आवाहन करून सुद्धा थकबाकीदारा कडून प्रतिसाद मिळत नसल्याने नगर परिषद वसुली पथकाकडून सदरील नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई करण्यात आली. मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश साबळे कर विभाग प्रमुख, सचिन पवार, गोविंद चव्हाण, प्रताप भूजवने, राजेश्वर शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# हिंगोलीत श्री भगवान परशुराम रथयात्रा स्वागतासाठी नियोजन बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**

श्री भगवान परशुराम रथ यात्रा २२ एप्रिल रोजी हिंगोली येथे दुपारी आगमन होणार आह. ही रथ यात्रा नगर ते माहूर असे नियोजन आहे. रथ यात्रा मार्गात अनेक ठिकाणी समाज बांधवाकडून स्वागताची सुरू आहे.

या रथयात्रेच्या अनुषंगाने २४ मार्च रोजी हिंगोली येथे रथ यात्रा आयोजकांनी हिंगोलीत येथे येऊन रथ यात्रा नियोजनाबाबत एस. बी. सिटी भागातील देशपांडे यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. त्यानंतर शिवाजी नगरमध्ये गणेश पहिनकर यांच्या निवासस्थानी नियोजनाची बैठक झाली. यावेळी रथ यात्रेचे स्वागत करण्यास ब्राह्मण समाज बांधवांनी उपस्थित रहावे व श्री भगवान परशुराम पादुकांची पूजा करावी असे सांगून विविध विषयावर चर्चा होऊन सौ विजयाताई कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीत श्रेया देशमुख, अतुल शुक्ल, विजय देशपांडे, गणेश पहिणकर, विश्वंभर जोशी, रमेशराव जोशी, गांजापुरकर राघव खंडेलवाल आदींची उपस्थिती होती. रथयात्रेचे भव्य स्वरूपात स्वागत करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाविहार बुद्धगया मुक्ती आंदोलनचा अभुतपुर्व महामोर्चा

छायाचित्र नरेंद्र गडप्पा




छायाचित्र नरेंद्र गडप्पा



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ मार्च**

बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात असलेले बिहार राज्यातील महाबोधी महाविहार बौद्ध गया हे बौद्ध भिक्खू आणि बौद्ध धर्मी यांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी आज दि. २५ मार्च रोजी महामोर्चा काढण्यात आला. नांदेड जिल्ह्यातील हजारो बौद्ध अनुयायी या मोर्चात सहभागी झाले.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बुद्धविहार गेली वर्षांनवर्षे बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात आहे. विशेषतः हिंदू धर्मीयांनी बुद्धविहाराचे व्यवस्थापनावर ताबा घेऊन मनमानी चालवली असून बुद्धिस्ट टेम्पल क्ट १९४९ नुसार हा ताबा असल्याने बौद्ध धर्मीय भिक्खू आणि बौद्ध अनुयायींच्या न्याय हक्कावर गदा आणली आहे. त्यामुळे सदर कायदा तत्काळ रद्द करण्याच्या मागणीसाठी भारतभर बौद्ध भिक्खू आणि अनुयायींनी व्यापक आंदोलन छेडले आहे.

त्या अनुषंगाने जिल्ह्यातील समस्त भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच जिल्ह्यातल्या विविध आंबेडकरी राजकीय- सामाजिक संघटनांनी या महामोर्चाचे आयोजन केले होते. नांदेडच्या कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान नवीन मोंढा आज दुपारी १ च्या सुमारास जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायींचा जमाव जमला. नवा मोंढा मैदान येथून महामोर्चाची सुरुवात होवुन नियोजित भगवान बुद्ध पुतळा, महात्मा फुले पुतळा, शिवाजीनगर, कलामंदिर, वजीराबाद चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चाचा काढण्यात आला. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजकांच्या वतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. या मोर्चातील सहभागी आंदोलकांना ठिकठिकाणी अन्नदान तसेच पाणी वाटप करण्यात आले.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात भारतीय संविधानावर राष्ट्रीय परिषद

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २५ मार्च**

शहरातील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या लोकप्रशासन विभागाच्या व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आले होते. भारतीय संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वीरभद्र शिक्षण संस्थेचे जेष्ठ सदस्य तथा माजी प्राचार्य डी.बी. वंजे, उद्घाटक म्हणून सिनेट सदस्य डॉ. अशोक मोटे, बीज भाषक करिमनगरच्या शासकीय कला व विज्ञान महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एम. सत्यप्रकाश, विशेष उपस्थिती संस्थेचे उपाध्यक्ष सुभाषअप्पा शिवपुजे, सचिव रणजित पाटील हंगरगेकर, सहसचिव शंकरराव बसापूरे, कोषाध्यक्ष ओंकारअप्पा मठपती, जेष्ठ सदस्य शिवराज पाटील हंगरगेकर, महाविद्यालय विकास समिती सदस्य हणमंतराव मस्कले, सिनेट सदस्य डॉ. विष्णू पवार, लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एम.आय.शेख, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखाधिकारी नरेंद्र पटले, प्राचार्य डॉ. मनोहर तोटरे, प्राचार्य डॉ. एस.बी.अडकिणे, उपप्राचार्य प्रा.एस.बी.बळवंते, व्यासपीठावर प्रा.सी.बी.साखरे, स.स.मस्कले, प्रा.डॉ. इंगळे, हणमंतराव पताळे, डॉ. शंकर सकनुरे, हे उपस्थित होते. प्रास्ताविक संयोजक प्रा.डॉ. चांदोबा कहाळेकर, सूत्रसंचालन, आभार व संविधान वाचन प्रा.डॉ. दिलीप आहेर, प्रा.डॉ. प्रसाद जोशी, प्रा.डॉ. विजय वारकड यांनी मानले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रम सुरू झाला. सदरील कार्यक्रम हा उद्घाटन, समारोप व तीन सत्रातून घेण्यात आला. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सहसचिव शंकरराव बसापूरे हे होते. संयोजक डॉ. सी.एम.कहाळेकर, सहसंयोजिका तथा लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. ए.एन.गित्ते, सहसंयोजक डॉ. अर्जुन गजमल यांचा सत्कार करण्यात आला.

बीजभाषक डॉ.एम. सत्यप्रकाश यांनी भारतीय संविधान तयार करण्यासाठी सर्वच घटक मोलाची कामगिरी बजावली होती. त्यामुळेच जगामध्ये सर्वश्रेष्ठ लोकशाहीची अंमलबजावणी करण्यासाठी भारतीय संविधान कार्य करते. राज्यघटनेच्या प्रत्येक कलमामुळेच सामाजिक सौहार्दाचे वातावरण तयार आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार या दोघांमध्ये समन्वय साधून कार्य केवळ संविधानामुळे शक्य आहे. विविध होणाऱ्या घटना दुरुस्तीमुळे बदलत्या काळानुसार निर्णय घेण्यात येत आहे असे मार्गदर्शन केले.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणातून डी.बी.वंजे यांनी स्वातंत्र्य आणि समता स्थापित करण्यासाठी निती, नैतिकता बाळगून संविधानाचे पालन करावे. स्वायत्त संस्था तळागाळातील लोकांसाठी काम करतात. लोकशाही टिकवण्यासाठी सत्तेची मुजोरी, भ्रष्टाचार रोखले पाहिजे. राज्यकर्ते स्वातंत्र्याचा स्वैराचार करणे थांबविले पाहिजे. मतदानाकरिता पैसा व इतर गैरमार्गाचे अमिष रोखले पाहिजे असा विचार मांडले.

## संक्षिप्त वृत्त




### अनिल वडजे पाटील यांना युवा उद्योजक पुरस्काराने सन्मानित

**उमरी**-उमरी तालुक्यात नव्हे तर नांदेड जिल्हात ही अनिल टेन्ट हाऊस डेकोरेशन प्रसिद्ध झोतात अग्रेसर अल्याने त्यांचे मालक अनिल पा . वडजे नागठाणेकर यांना नांदेड येथे उदोजक म्हणून नुकताच पुरस्कार जाहीर करून मान्यवराच्या हस्ते सन्मान करून गौरविण्यात आले आहे. व्हिपिके पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने नांदेड येथे वसंत हंकारे यांच्या व्याख्याना दरम्यान माजी राज्यमंत्री डी.पी. सावंत यांच्या हस्ते युवा उद्योजक पुरस्कार उमरी येथील अनिल दिगंबर पाटील वडजे नागठाणेकर यांना प्रदान करण्यात आला आहे . यासह अनेकाना दुग्ध व्यवसाय पुरस्कार, ब्युटी पार्लर पुरस्कार देण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध उदोजक मारोतराव कवळे गुरुजी, प्रमुख व्याख्याते वसंत हंकारे, जगनराव शेळके, लिंगराम पाटील कवळे, परमेश्वर पाटील कवळे आदींच्या उपस्थित युवा उद्योजक पुरस्कार देण्यात आला आहे . यावेळी व्हिपीके कवळे पंतसस्थेचे सीईओ आनाराव पाटील शिंदे, पतसंस्थेचे सचीव नागनाथ पांचाळ, संचालक किशनराव रॅपनवाड, पतसंस्थेचे सरव्यवस्थापक नामदेवराव इंगोले, गजानन कोत्तावार, दत्तात्रय उबाळे, शिवाजी पाटील, मधुकर पाटील बोळसेकर, सिंधीचे सरपंच विलास पाटील नरवाडे, प्रल्हाद हिवराळे, श्रीनिवास ढगे, मधुकरराव पोशट्टी बोथीकर, माधवराव पाटील ढगे, दिलीप पुयड, रावसाहेब पाटील वडजे, आंनद चव्हाण, शिवाजी कदम आधी उपस्थित होते. व्याख्याते हंकारे यांनी सोशल मिडीयाचा दुष्परिणाममुळे समाजात अन्याय अत्याचार वाढत असल्याने नाते गोते दूर होत चालले, मुली मुले यांनी आपल्या आईवडील नात्यात दूर होत चालले आहेत. अशा घटना घडू नये यासाठी वसंत हंकारे यांनी दुष्परिणामाची जाणीव करत आईबाप समजून घेताना आणि आईबाप काय आहेत याची जाणीव व्याख्यानातून करून दिली आहे. अशा उपक्रमातून समाजात परिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही असे अध्यक्ष समारोप भाषणात डी.पी. सावंत यांनी प्रतिक्रीया व्यक्त केली असे उपक्रम हे तरुणासाठी प्रेरणादाई ठरणार असून असे उपक्रम घेणे काळाजी गरज असल्याचे ही माजी राज्यमंत्री डी पी सावंत यांनी मार्गदर्शन करतांना बोलत होते . मात्र व्याखान विद्याते वंसत हंकारे यांच्या आई - बाप हेच सर्वस्व देव आहेत असे पटवून सांगीतल्याने उपस्थित तरुण मुला मुलिच्या डोळ्यातून अश्रू अनावर झाले नाही त्यांच्या अस्ल मठारी भाषेच्या बाणाण्यात आई - वडिल ठसकावून समजावून सांगितल्याने उपस्थिता चे पारणे पेढण्याजोगी व्याखान होते.

### डॉ. राजेंद्र गोणारकर यांच्या ‘नवी लिपी’ कवितासंग्रहास नामदेव ढसाळ पुरस्कार

**नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विद्यापीठातील



माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक तथा लेखक - कवी डॉ. राजेंद्र गोणारकर यांच्या अलीकडेच दुबई येथे प्रकाशित झालेल्या ’नवी लिपी’ कवितासंग्रहास जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचा यंदाचा नामदेव ढसाळ राज्यस्तरीय काव्य पुरस्कार जाहीर झाला आहे. ’नवी लिपी’ ह्या कवितासंग्रहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याची कलात्मक नोंद घेणाऱ्या व कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या कविता समाविष्ट आहेत. डॉ. राजेंद्र गोणारकर यांचा हा दुसरा कवितासंग्रह असून त्यांची ’निळे आकाश’, ’सूर्यपक्षी’, ’मराठवाड्यातील आंबेडकरी प्रबोधन पर्व’, ’दलित पँथर : सम्यक आकलन’ आदि तेरा पुस्तके प्रकाशित आहेत. येत्या ३० मार्च रोजी नागपूर येथे विशेष समारंभात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे व सरचिटणीस डॉ. प्रकाश करमाडकर यांनी पत्राद्वारे कळविले आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

### शिक्षकांची क्षमता वृद्धी झाली पाहीजे : विठ्ठल दगडगावे

**नायगांव**-नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्या करिता शिक्षकांचीक्षमतावृद्धी होणं अत्यंत आवश्यक आहे, तरच येणारी नवीन पिढी अधिक सक्षम बनेल असे मत शिक्षणविस्तार आधिकारी विठ्ठल दगडगावे यांनी व्यक्त केले. उद्घाटन प्रसंगी प्राचार्य केरबा फाजगे , प्राचार्य केशव सूर्यवंशी ,शिक्षण विस्ताराधिकारी, विठ्ठल दगाडगावे, केंद्रप्रमुख शिवराज साधू,केंद्रप्रमुख कपिल गारठे, बालाजी नागठाणे यांचे व सर्व प्रशिक्षणार्थी यांचे स्वागत करण्यात आले.दिनांक २४ ते २८ मार्च या पाच दिवसा च्या कालावधीमध्ये हे प्रशिक्षण हे येथे पार पडत असून या मध्ये इयत्ता पहिली ते बारावीच्या प्रशिक्षणार्थी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आहे.या सर्व शिक्षकांना मार्गदर्शन करण्या साठी सुलभक म्हणून महेंद्र बुद्धपा, सचिनसिंह तेहरा,अनुपमा बन,महेश्वर नलबलवार, प्रल्हाद खानापुरे,रमेश बनकर,शोभा तोटावाड, महेश हानवटे, सदाशिव सोनटक्के , हे आनंदायी पाच दिवसीय प्रशिक्षण चालणार आहे .

# नांदेड आगाराला मिळाल्या पाच नवीन लालपरी बसेस

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ मार्च**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगाराला एसटी महामंडळाकडून पुणे दापोडी येथील रा.प.म. कार्यशाळेतून अशोक लेलँड कंपनीच्या नव्या कोऱ्या लालपरी पाच बसेस नुकत्याच प्राप्त झाल्या असून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते या नव्या लालपरी बसेसचे पुजन करून प्रवाशी सेवेमध्ये मार्गास्त करण्यात आले. या नव्या कोऱ्या लालपरी बसेसमुळे प्रवाशी सेवेमध्ये आरामदायी सुखकर प्रवास होणार आहे. सध्या या पाच नव्या कोऱ्या लालपरी बसेस कोल्हापूर, नागपूर, शेगाव या मार्गावर धावत आहेत.

# बोधडी येथे महिला-पुरुषांकडून अण्णाभाऊ साठे पुतळा परिसराची स्वच्छता

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २५ मार्च**

सत्संगाच्या कार्यक्रमानिमित्त आलेले ख्यातनाम कीर्तनकार हभप नारायण महाराज माधापुरकर यांच्या संकल्पनेतून बोधडी बु येथील शेकडो महिला व पुरुषांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळा परिसराची श्रमदानातुन स्वच्छता केली असून या निमित्ताने त्यांनी कीर्तनातुन ईश्वरीय साधना आणि स्वच्छतेतुन महापुरुषाबद्दलचा आदरभाव जागृत करून समाजाला नवा आदर्श घालून दिला आहे.



ह भ प नारायण महाराज माधापुरकर हे महाराष्ट्रातील ख्यातनाम व सुप्रसिद्ध कीर्तनकार म्हणून परिचित आहेत. त्यांचे सत्संग व किर्तन ऐकण्यासाठी महिला व पुरुष आतुरलेले असतात. दरम्यान दि २३ मार्च रोजी ते किनवट तालुक्यातील बोधडी बुद्रुक येथे ते सत्संग कार्यक्रमानिमित्त आले असता लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्या परिसरातील दुर्गंधी व अस्वच्छता पाहून त्यांचे मन व्यथित झाले. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी शाहिरी जलसातुन आयुष्यभर समाज प्रबोधनाचे कार्य केले. अशा महापुरुषांचे पुतळे हे समाजासाठी प्रेरणादायी असतात. प्रत्येक महापुरुषांच्या पुतळ्यांचा परिसर पवित्र व स्वच्छ ठेवणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य असल्याचे हभप नारायण महाराज यांनी सत्संगादरम्यान सांगितले असता कार्यक्रमाचा समारोप झाल्यानंतर सत्संगाला उपस्थित असलेल्या असलेल्या शेकडो महिला व पुरुषांनी ह भ प नारायण महाराज यांच्या संकल्पनेतून बोधडी बुद्रुक येथील साठेनगरात असलेल्या आण्णाभाऊ साठे पुतळा परिसराची श्रमदानातून साफसफाई केली. पुतळा परिसरात जागोजागी असलेला कचरा, गवत व घाण काढून नागरिकांनी हा परिसर चकाचक केला. ह भ प नारायण महाराज माधापूरकर यांनी केलेल्या आवाहनाला साद देत भाविकांनी हे श्रमदान केले असून राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून नारायण महाराज माधापुरकर यांनीही कीर्तनातून परिवर्तन आणि स्वच्छतेतून महापुरुषाबद्दलचा आदरभाव जागृत केल्यामुळे त्यांच्या या कार्याचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# आमदार राम भदाणे पाटील यांचे नांदेडमध्ये स्वागत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ मार्च**

धुळ्याचे भारतीय जनता पक्षाचे आमदार राम भदाणे पाटील यांचे काल नांदेड येथे आगमन झाले, त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

राष्ट्रवादी मुखेड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव यांनी आयोजित केलेल्या एका कार्यक्रमासाठी आमदार भदाणे पाटील नांदेड येथे आले होते. त्यांच्या सोबत धुळे जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष बाळासाहेब भदाणे पाटील हे पण उपस्थित होते. केवळ ३१ वर्ष वयात आमदार होण्याची संधी राम भदाणे पाटील यांना मिळाली असून त्यांचे आजोबा स्व. यावेळी त्यांच्या स्वागताला मुखेड तालुका राष्ट्रवादी (शरद पवार) काँग्रेसचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव, नानक साई फाऊंडेशन चे अध्यक्ष तथा वरिष्ठ पत्रकार श्री पंढरीनाथ बोकारे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पार्टीचे नेताजी भोसले, संजय पवार, सरदार टेहल सिंघ,पत्रकार आयनाले सर, बॅरिस्टर राजीव जाधव, रवी जाधव, व्यंकटराव टेकाळे,नरसिंह जाधव, मारोतराव डक पाटील,अविनाश जाधव हे उपस्थित होते.

# डिजे मुक्त वातावरणात शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २५ मार्च**

दि.२३ रोजी मुगट येथील मुख्य रस्त्यावर दरवर्षी प्रमाणे यावर्षीही हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते.



पारंपारिक ढोल ताशा पथकाच्या गजरात,वाजत गाजत ही भव्य दिव्य मिरवणुक डिजे मुक्त वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी संतश्री आत्माराम महाराज बोधीमंठाचे मठाधिपती सितारामजी महाराज यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच मठाधिपती मोतीगीर महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने गावातील शिवप्रेमीची उपस्थिती होती. शिवजयंती मंडळाकडून प्रथम ढोल ताशा पथकाला जयंती निमित्ताने पाचारण करण्यात आले होते. सायंकाळी सहा वाजता गावातील मुख्य रस्त्यांनी ढोल ताशांच्या गजरात, उत्साह पुर्ण वातावरणात ही जयंती मिरवणूक काढण्यात आली. गावात प्रथमच ढोल ताशा पथक आल्यामुळे त्यांना पाहण्यासाठी लोकांनी रस्त्यांनी गर्दी केली होती. सद्या जयंती म्हटले की डिजे हा आलाच.परंतु याच डिजे मुळे तरुणांमध्ये वाद होऊन ते विकोपाला जात आहेत. त्यामुळे जयंती मंडळाने गावात जयंती शांततेत, उत्साहात साजरी करण्यासाठी ढोल पथकाला पाचारण करण्यात आले होते.

कुठला ही अवाढव्य खर्च न करता जयंती उत्साहात व डिजे मुक्त वातावरणात संपन्न झाली. त्यामुळे जयंती मंडळाचे गावात सर्वत्र कौतुक होतांना दिसत आहे. यावेळी दादाराव मुंगल,मुर्ताजी मुंगल, अनिल कल्याणे, मनोज भांगे,राजु मुंगल,राजु कल्याणे, अंकुश मुंगल, आनंदा मुंगल, गोविंद मुंगल, आदींनी जयंती साजरी करण्यासाठी परिश्रम घेतले होते.

# हदगाव न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालतीत २७३ प्रकरणा मधून ४४ लाख ७० हजार वसूल

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २५ मार्च**

तालुका विधी सेवा समिती, हदगाव च्या वतीने २२ मार्च २०२५ रोजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, हदगाव येथे राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. लोकअदालत मध्ये २७३ प्रकरणे निकाली लागली असून त्यामधून ४४,७०,४४९ एवढी रक्कम वसूल करण्यात आली.



सदर लोकअदालत मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया शाख हदगाव, तामसा व पंचायत समिती हदगाव येथील कर्जवसुली आणि दाखलपुर्व प्रकरणांपैकी एकुण २७३ प्रकरणे निकाली काढण्यात आली असुन त्यामधुन एकुण रु. ४४,७०,४४९/-एवढी रक्कम वसुल करण्यात आली. तसेच न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांपैकी एकुण ३५ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश अमरजीत भा. जाधव, सहदिवाणी न्यायाधीश रामचंद्र द. माने, तालुका अभिवक्ता संघाचे अध्यक्ष एच. एम. मदनी व सर्व सन्मानीय विधिज्ञ आणि न्यायालयातील सर्व कर्मचारी, पंचायत समितीचे कर्मचारी, स्थानिक बँकेतील कर्मचारी व कोर्ट ड्युटी पोलीस कॉन्स्टेबल यांनी परिश्रम घेऊन राष्ट्रीय लोकअदाल यशस्वी पार पाडण्यास सहकार्य केले.

# बोगस रेशन कार्ड देणाऱ्या सेतू चालकावर गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ मार्च**

नांदेड ग्रामीण परिसरात बोगस रेशन कार्ड काढून देणाऱ्या सेतू चालकावर आज गुन्हा दाखल करण्यात आला. नागरिकांनी पात्रता नसताना रेशन कार्ड काढण्याचा प्रयत्न करू नये व कोणाच्याही खोट्या दाव्याला बळी पडू नये, असे आवाहन तहसीलदार नांदेड संजय वारकड यांनी केले आहे.

तहसील कार्यालय नांदेड येथील पुरवठा विभागामध्ये एक व्यक्ती त्यांच्या रेशन कार्ड ऑनलाइन झाले आहे. परंतु धान्य मिळत नाही म्हणून तक्रार करायला आला होता, कर्मचाऱ्यांनी अधिक तपासणी केली असता असे निदर्शनास आले की त्यांचे रेशन कार्ड हेच फसवे आहे.

संबंधित व्यक्तीला फक्त ऑनलाइन एक पेज देण्यात आले होते. तर रेशन कार्ड हे बोगस असल्याचे निष्पन्न आहे.


या प्रकार लक्षात येता तात्काळ पोलीस निरीक्षक वजीराबाद पोलीस स्टेशन यांना बोलावून त्या व्यक्तीला त्यांच्या ताब्यात देण्यात आले.पुरवठा निरीक्षण अधिकारी श्री.रवींद्र राठोड यांना प्राधिकृत करून संबंधित सेतू चालक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यांनी दिलेले सहा रेशन कार्ड असे बनावट सापडले आहेत. संबंधीत सेतू चालक ऋषिकेश पेदेवाड राहणार सिडको नांदेड यांच्यावर या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे, तहसील कार्यालयातील कोणत्याही दस्तऐवज काढून देण्यासाठी किंवा सुविधा देण्यासाठी स्थानिक कर्मचाऱ्यांशी चर्चा करावी. एजंट व अनोळखी लोकांच्या तोतयेगिरीला बळी पडू नये, असे आवाहन तहसीलदार संजय वारकड यांनी केले आहे.

# एकनाथ पवार यांची आ.प्रताप पाटील चिखलीकरांवर खरमरीत टिका

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २५ मार्च**

नांदेड भाजपचे खा. अशोक चव्हाण यांना राजकीय विरोध आणि वैयक्तिक द्वेष हाच आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या राजकारणाचा एकमेव अजेंडा आहे.अशी टिका लोहा मतदारसंघाचे भाजप नेते एकनाथ पवार यांनी केली.




आ.प्रताप पाटील चिखलीकर महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख राजकीय पक्षात प्रवेश करुन आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजीत दादा पवार) पक्षात येऊन अशोक चव्हाण यांना शह देऊ शकत नाहीत. आणि पुढेही त्यांचे मुंगेरीलालचे स्वप्न साकार होणार नाहीत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमात आ. चिखलीकर यांनी खा. अशोक चव्हाण यांच्यावर केलेल्या टिकेला उत्तर देताना ते बोलत होते. पवार म्हणाले की, चिखलीकर यांनी नेहमीच चव्हाणांचा पर्याय म्हणून स्वतः ला स्थापित करण्याचा अट्टाहास बाळगला आहे. या राजकीय महत्वाकांक्षेसाठी त्यांनी दर पाच वर्षांनी पक्ष बदलला. काँग्रेस, अपक्ष, शिवसेना, भाजप आणि आता राष्ट्रवादी काँग्रेस असे राजकीय प्रवासाचे वर्तुळ त्यांनी पूर्ण केले. दरवेळी नवीन पक्षात प्रवेश केला आणी हाच माझा शेवटचा पक्ष आहे, असे सांगून स्वतःच्या पक्षांतराचा बचाव करण्याचा खटपट केला. मात्र, इतक्या कोलांटउड्या मारूनही चव्हाणांच्या राजकीय वर्चस्वाला धक्का लावू शकले नाही.

नांदेड जिल्ह्याचा राजकीय कल नेहमीच अशोकराव चव्हाणांच्या बाजूने राहिला. येणारा काळातही पुनः जनता सिद्ध करून दाखवेल. खा. अशोकराव चव्हाण हे देश पातळीवरील राज्याचे प्रमुख नेते आहेत. वैचारिक परिपक्वता, विकासाची दृष्टी, सार्वजनिक प्रश्नांची जाण, प्रशासनिक कौशल्य, कर्तृत्व अशा प्रत्येक आघाडीवर अशोकराव चव्हाण यांनी स्वतः ला सिद्ध केले आहे. राज्यात आणि नांदेड जिल्ह्यात आज भारतीय जनता पक्षाची ताकद सर्वाधिक आहे. देशाचे आणि राज्याचे नेतृत्व भाजपकडेच आहे. जिल्ह्यात भाजपचे ५ आमदार, २ खासदार आहेत. आजवरच्या इतिहासात नेतृत्व म्हणून नांदेड जिल्ह्याची पहिली पसंती नेहमी खा. अशोक चव्हाण यांनाच राहिली आहे. त्यांच्याकडे उत्तम संघटन कौशल्य आहे. जिल्ह्यातील भाजपचे लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन पक्षाची बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. त्यामुळे नांदेडची जनता पुढील काळात भाजप व खा. अशोक चव्हाण यांच्या पाठीशी उभी राहिल, असा विश्वास एकनाथ पवार यांनी व्यक्त केला.

आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी नेहमी तात्कालिक व संकुचीत राजकारणाचा आधार घेतला. संघटनात्मक बांधणीत त्यांना शून्य स्वारस्य असून, दरवेळी नाराजांची, असंतुष्टांची मोट बांधून आणि दडपशाहीच्या बळावर राजकारण केले. असे नकारात्मक राजकारण कधीही यश संपादन करू शकत नाही. सध्या तर ते स्वतःच राष्ट्रवादीत किती काळ राहणार, यावर मोठे प्रश्नचिन्ह आहे. अजूनही त्यांचे संपूर्ण कुटूंब राष्ट्रवादीत गेलेले नाही. आ.चिखलीकर पुन्हा संधी मिळाली तर उद्या दुसरीकडे दिसली, राजकीय स्वार्थापोटी भूमिका बदलण्यास त्यांना क्षणाचाही अवधी लागणार नाही. या ना त्या कारणाने त्यांच्या कच्छपी लागलेल्या मंडळींची अवस्था ’खटक्यावर बोट, टांगा पलटी आणि घोडे फरार’ अशी होणार. ही काळ्या दगडावरची रेघ असल्याचेही भाजप नेते एकनाथ पवार यांनी म्हटले आहे.

# बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांचे निलंबन

## कोविड काळातील भ्रष्टाचार भोवला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ मार्च**

बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर अशोक थोरात यांचे निलंबन केले जाणार असल्याची घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत केली आहे. कोविड काळात घोटाळा केल्याचा भाजप आमदार नमिता मुंदडा यांनी अधिवेशनात लक्षवेधी मांडली.

या प्रश्नावर उत्तर देताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधिमंडळात निलंबन करण्यात येईल तसेच तीन महिन्यात विभागीय चौकशी पूर्ण करावी अशी घोषणा केली आहे.

कोविड काळात बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा केला. या घोटाळ्यात डॉ. थोरात दोषी आढळले होते. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी त्यांची बीडहून नाशिकला बदली करण्यात आली. परत पुन्हा बीड जिल्ह्यात बदली का? दोषी असतील तर डॉ अशोक थोरात वरती गुन्हा दाखल करणार का? असा सवाल नमिता मुंदडा यांनी केला. तसेच प्राथमिक चौकशीमध्ये डॉ. अशोक थोरात औषध खरेदीमध्ये प्रथमदर्शनी अनियमित्ता आढळून आली, असे भाजप आमदार नमिता मुंदडा यांनी अधिवेशनात लक्षवेधी मांडली.



या प्रश्नावर उत्तर देताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधिमंडळात निलंबन करण्यात येईल तसेच तीन महिन्यात विभागीय चौकशी पूर्ण करण्यात येईल अशी घोषणा केली आहे. ते म्हणाले की, बीड जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन आणि त्यांच्या कामकाजाबद्दल खूप गंभीर आक्षेप आहेत. निश्चितपणाने सिव्हिल सर्जन अशोक थोरात यांना आपण सस्पेंड करत आहोत. त्यांना निलंबित करून तीन महिन्यांच्या कालावधीत चौकशी पूर्ण करण्यात येईल. या मध्ये जे दोष आढळतील, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा आरग्यमंत्र्यांनी केली.

कोण आहेत डॉक्टर अशोक थोरात?

डॉ. अशोक थोरात पूर्वी आरोग्य मंत्री विमल मुंदडा यांचे ओएसडी होते. त्यानंतर पुन्हा ते जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून बीडमध्ये रुजू आहेत. या पूर्वी देखील बीडमध्ये ते जिल्हा शल्य चिकित्सक होते. दरम्यान, मस्सोजागचे सरपंच संतोष देशमुख यांचा पोस्टमार्टम रिपोर्ट अशोक थोरात यांनी दिला होता. अंजली दमानिया यांनी आरोप केल्यानंतर अंबाजोगाई येथील पियुष इन हॉटेल चर्चेत आले होते. त्यानंतर डॉ. अशोक थोरात यांच्यावर मोठी कारवाई करण्यात आली आहे.

# कोल्हारवाडी बिबट्या मृत्यू

## नखे गायब, पंचनाम्यात निष्पन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ मार्च**

बीड तालुक्यातील बालाघाट डोंगर पटयाचया परीसरात गेल्या महिनाभरापासून बिबट्याने कहर माजला असून गेल्या आठवड्यात कोल्हारवाडी येथे आसाराम मुळे यांच्या शेतात करंट लागून बिबट्याचा मृत्यू झाला होता. वनविभागानी पंचनामा केला असता बिबट्याचे पाय आणि तोंड अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्याचे दिसून आले. आठ दिवस उलटून गेली तरी अद्याप तपास लागला नसल्याने या बीड वन विभागाचा तपास संथ गतीने सुरू असून बिबट्या मृत्यू प्रकरणाचा तपासावर संशय निर्माण होत असून मुख्य वनसंरक्षक छत्रपती संभाजी नगर यांनी दखल घेऊन दोषीवर कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.



बीड तालुक्यातील कोल्हारवाडी येथे गेल्या आठ दिवसांपूर्वी आसाराम मुळे यांच्या शेतात लाईटचा करंट लागून बिबट्याचा मृत्यू झाला होता. वनपाल अंगद बहिरवाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे, वनरक्षक डोळस व कोल्हारवाडी येथील नागरिक यांनी पंचनामा करताना मयत बिबट्याचे तोंड आणि पाय वाघनख्या पंचनामा करण्यापूर्वी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्याचे दिसून आले. या प्रकरणाचा तपास वनपाल अंगद बहिरवाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे हे विभागीय वनाधिकारी अमोल गरकळ यांच्या मार्गदर्शनाखाली करत असले तरी या प्रकरणाला आठ दिवस होवून गेले आहेत.तरी अद्याप या प्रकरणाचा तपास संथ गतीने सुरू असून एकाही संशयीत व्यक्तीवर कारवाई केलेली नाही. या बिबट्याच्या वाघनख्या पाय आणि मुंडके या चोरी प्रकरणी तपासावर संशय निर्माण होत असून या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य वनसंरक्षक यांनी या प्रकरणी दखल घेऊन दोषीवर कडक कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे

# बीड तालुक्यात कोण होणार सरपंच, आरक्षण झाले निश्चित

## तालुक्यातील १७५ पैकी ८९ ग्रामपंचायतींमध्ये महिला राज

**अनुसूचित जातीच्या ११ तर अनुसूचित जमातीच्या एका महिलेला संधी**

**ओबीसी महिलांपैकी २४ तर खुल्या प्रवर्गातील ५३ महिला होणार सरपंच**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२५ मार्च**

महाराष्ट्र ग्रामपंचायत ( सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील नियम - ३ - ( अ ) , ब तसेच ४ प्रमाणे तालुका निहाय बीड जिल्हयातील १०३४ ग्रामपंचायती वेगवेळया प्रवर्गासाठी व महिलासाठीच्या सरपंच पदाचे आरक्षण मंगळवारी ( २५ मार्च ) निश्चित करण्यात आले आहे . त्यानुसार १०३४ पैकी अनुसूचित जातींच्या माहिलासाठी ७३ , अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आठ , नागरिकांचा मागास प्रवर्ग ( एसबीसी ) १४२ तर खुल्या प्रवर्गातील ३०३ महिलांना सरपंच पदाचे आरक्षण मिळणार आहे . अशी अधिसूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जारी केली.

हे आरक्षण निश्चित करताना त्या त्या तालुक्यातील अनुसूचित जाती , जमाती , नागरिकांचा मागासप्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गाच्या व्यक्तींसाठी त्या त्या जाती , जमाती व मागास प्रवर्गीय महिलांसाठी ग्रामपंचायतींची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार निश्चित केली आहे.



तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील सरपंच पदे अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती , नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्ग यासाठी राखीव ठेवताना महाराष्ट्र ग्रामपंचायत ( सरपंच व उपसरपंच ) निवडणूक नियम १९६४ मधील नियम ५ व ६ मध्ये नमुद तरतुदी तसेच ग्रामविकास विभागाने वेळोवेळी निर्गमीत केलेले शासन निर्णय , आदेश आणि परिपत्रकानुसार सरपंच पदाच्या आरक्षणाची कार्यवाही नियमानुसार पूर्ण करावी ,असे आदेशही जिल्हाधिकारी यांना जिल्हयातील सर्व तहसीलदारांना दिले होते . याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी शैलेंद्र सूर्यवंशी , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , तहसीलदार अविनाश शिंगटे यांनी सविस्तर प्रशिक्षण घेतले होते .

बीड तालुक्यातील एकूण १७५ सरपंच पदांपैकी अनुसूचित जातीतील सर्वसाधारणसाठी १० आणि महिलांसाठी ११ , अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी एक , नागरिकांच्या मागास प्रवर्गातील सर्वसाधारणसाठी २३ तर महिलांसाठी २४ , खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारणसाठी ५२ आणि महिलांसाठी ५३ असे सरपंच पदाचे आरक्षण असेल.

बीड तहसील कार्यालयात वरील प्रमाणे महिला आरक्षण काढण्याची प्रक्रिया मंगळवारी दुपारी अकरा वाजता सुरू झाली . यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधव , अव्वल कारकून महादेव चौरे , वामन तोगरगे , संतोष मुळीक , महसूल सहाय्यक सुधाकर नागरगोजे , अमोल डोंगरे , ग्राम महसूल अधिकारी कृष्णा रत्नपारखे , दादासाहेब शेळके व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी उपस्थित होते . सर्वप्रथम तालुक्यातील उपस्थित सर्व नागरिकांना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कशा पद्धतीने आरक्षण सोडत काढण्यात येईल , याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले . शिवाय कोणाला काही अडचण असल्यास त्यांनी ती अडचण मांडावी जेणेकरून त्यांचे समाधान होईल , असे सांगितले . यावेळी लहान मुलगा श्रेयस गायकवाड याच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या . ह्या प्रक्रियेची संपूर्णतः व्हिडिओग्राफी करण्यात आली . उपस्थित नागरिकांनीही सदरची प्रक्रिया अगदी सुटसुटीतपणे आणि कायदेशीरपणे झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# स्वयंसेवकाचे नेतृत्व गुण घडण्यासाठी प्रेरणा शिबिराची आवश्यकता-प्रा.चंद्रकांत मुळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ मार्च**

बीड दिनांक २५ मार्च २०२५ येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथे प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण शिबिर दिनांक १७ २०२५ मार्च ते २१ मार्च २०२५ या दरम्यान संपन्न झाले. या शिबिरासाठी विद्यापीठ क्षेत्रातील विविध महाविद्यालयातून१२ स्वयंसेवकांची निवड करण्यात आलेली होती. त्यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेविका कु. नंदिनी रुईकर या विद्यार्थिनीची निवड झालेली होती. कुमारी नंदिनी रुईकर हिने यशस्वीरित्या प्रेरणा शिबिर प्रशिक्षण पूर्ण केले . त्याबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रशासकीय अधिकारी तथा महाविद्यालयीन समितीचे अध्यक्ष प्रा.चंद्रकांत मुळे यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ.रमेश खंडागळे, डॉ.रूपाली कुलकर्णी, प्रा. राम गव्हाणे,कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे,डॉ संगीता ससाने या सर्वांच्या उपस्थितीमध्ये कुमारी नंदिनीचा सत्कार राज्यस्तरीय प्रेरणा शिबिराचे प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व स्वयंसेवकाची उपस्थिती होती.

# श्री चिंतेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या चि.संस्कार घोलप ची निवड

तभा वृत्तसेवा
गेवराई दि.२५ मार्च




भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्र्वर प्राथमिक विद्यालय गेवराई येथील इयत्ता ७ वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या *चि.संस्कार प्रकाश घोलप* याची ढ २० उीळलज्ञशीं -ीलळरींळेप`ष खप-वळर च्या वतीने ॠ उीळलज्ञशीं -ीलळरींळेप मध्ये णप-वशी १४ चॅम्पियन स्पर्धे साठी निवड झाली आहे सदरील स्पर्धा दिनांक १४ एप्रिल ते १७ एप्रिल दरम्यान गोवा येथे संपन्न होणार आहेत.सदरील निवडीबद्दल *चि.संस्कार* चे भा.शि.प्र.संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य स्था.नि.मं.अध्यक्ष श्री प्रमोद कुलकर्णी कार्यवाह श्री दत्ताजी पत्की शालेय शिक्षण समिती अध्यक्ष श्री अक्षय कुलकर्णी तसेच सर्व सन्माननिय पदाधिकारी, मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी,विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्या कडून अभिनंदन होत आहे.

# लिंबू दीडशेवर; गवार, लसूण शंभरी पार बीड शहरातील मंडईत

## हिरव्या भाज्यांची आवक घटल्याने दरांतील वाढ कायम





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ मार्च**

| भाज्यांचे भाव (प्रतीकिलो) |
| --- |
| बटाटे २५ |
| लिंबू १५० |
| गवारी १२० |
| कांदा २० |
| टोमॅटो १० |
| कारले ६० |
| गोबी २० |
| लसूण १०० |
| आद्रक ५० |
| कैरी ६० |
| वांगे २० |
| शेवगा ४० |

उन्हाळयाची सुरवात झाली असून पाणी कमतरता आणि उष्णतेमुळे भाजीपाल्याचे उत्पादन कमी झाले आहे. परिणामी सोमवारी (ता. २४) शहरातील भाजीमंडईत अनेक भाज्यांचे दर वाढले असल्याचे पाहायला मिळाले. यामध्ये लिंबाचा भाव दीडशे रुपये किलोपर्यंत पोचला असून गवारीच्या भाजीनेही शंभरी पार केली. त्यासोबतच हिरव्या मिरचीचाही भाव आता वाढत असल्याचे चित्र आहे.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणातील उष्णता वाढत आहे. पाणीसाठा देखील झपाट्याने कमी होत असून पाण्याच्या कमतरतेमुळे पिकांना आवश्यक त्या प्रमाणात पाणी मिळत नाही. ज्यामुळे भाजीपाल्याच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. शहरातील बाजारात भाज्यांची आवक कमी झाली आहे आणि त्याचा परिणाम किमतीवर दिसून येत आहे. यामुळे प्रमुख भाज्यांचे दर देखील वाढलेले आहेत. लिंबाच्या दरात मोठी भाव वाढ झाली असून प्रतीकिलो दीडशे रुपयांपर्यंत दर पोचला आहे. त्यासोबतच गवार आणि मिरची, लसूण, कारले या भाज्यांच्या दरातही चांगली वाढ झालेली आहे. भाजीपाल्याच्या वाढलेल्या किमतीमुळे ग्राहकांना मोठा त्रास होत आहे. आधी ज्या ठिकाणी किलोभर भाजी घेतली जात होती, तिथे आता ग्राहक अर्धा किलो भाजी घेतात. बजेट जुळवताना गृहिणींचे मात्र हाल होत आहेत. दुसरीकडे आवक वाढल्याने टोमॅटोचे भाव मात्र गडगडल्याचे पाहायला मिळाले. बाजारात सध्या टोमॅटोला केवळ १० रुपये भाव असल्याने टोमॅटो उत्पादकांची चिंता वाढलेली आहे. येणाऱ्या काही दिवसांत टोमॅटोचेही भाव वाढतील, अशी आशा ते व्यक्त करताहेत.

**गेल्या आठ दिवसांपासून होत असलेल्या दरवाढीमुळे आठवडे बाजारात जाताना आता अधिकचे नियोजन करावे लागते. सध्या उन्हाळा असल्याने सरबत आणि इतर वापरासाठी लिंबू घ्यायचे असतात. मात्र, लिंबाचा दरही आता चांगलाच वाढला आहे. हिव्या भाज्यांच्या किमतीही कमी होण्याची अपेक्षा आहे.**

**भाग्यश्री जाधव, गृहिणी.**

**बीड : शहरातील मंडईत विक्रीसाठी उपलब्ध असलेला भाजीपाला.**

**६६ उन्हाळ्यामुळे भाजीपात्याचे उत्पादन कमी झाल्याने दरवाढ झाली आहे. पाणी कमी पडत असल्यामुळे पिकांना देणे शक्य होत नाही. त्यामुळे उन्हाळ्याचे काही दिवस भाजीपाल्याचे दर असेच राहण्याची शक्यता वाटते.**

**भागवत खेत्रे, भाजी विक्रेते.**

# कारागृहात जीवन गाणे गातच जावे सांस्कृतिक कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ मार्च**

कारागृहातील कैद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्यात देशप्रेम, बंधुभाव जागृत करण्यासाठी महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालक मुंबई यांच्याकडून सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

राज्यातील ३६ काराग्रहात बंदिस्त असलेल्या कैद्यामध्ये राष्ट्रप्रेम जागृत करणाऱ्या तसेच कैद्यांच्या सुक्त कलागुणांना वाव देणाऱ्या प्रबोधनात्मक स्वरूप असणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन ३६ कारागृहामध्ये एकाच दिवशी एकाच वेळी दिनांक २५ मार्च २०२५ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर सांस्कृतिक कार्यक्रमात राज्यगीत तसेच देशासाठी बलिदान देणाऱ्या थोर महापुरुष व्यक्तीबद्दलही गीत गाण्यात आली.

या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर साहेब यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. सदर कार्यक्रमास जिल्हा विधी प्राधिकरण सेवा चे प्रमुख गजानन सोनी तसेच बीड जिल्हा कारागृहाचे प्रभारी अधीक्षक बक्सार मुलानी, कार्यक्रमाचे व्यवस्थापक तुकाराम सुवर्णकार व त्यांचे सहकारी व इतर अधिकारी कर्मचारी, बंदीबांधव उपस्थित होते.

# माजी आ.लक्ष्मण पवार व शिवराज पवारांच्या वतीने आयोजित इफ्तार पार्टीस उत्स्फूर्त



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२५ मार्च**

भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने सोमवार ता. २४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या रोजा इफ्तार पार्टीस मुस्लिम बांधवांनी उपस्थिती दर्शवून मोठा प्रतिसाद दिला. यावेळी युवा नेते शिवराज दादा पवार यांनी आलेल्या मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.

गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल सभागृहात भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. युवा नेते शिवराज पवार यांनी आलेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे स्वागत केले. पवित्र रमजान महिण्यानिमित्त मुस्लिम बांधव दिवसभर उपवास पाळतात. सायंकाळी उपवास सोडण्यात येतो. भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. सोमवार ता. २४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या इफ्तार पार्टीस गेवराई शहरातील मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली यावेळी शहरातील मुस्लिम बांधवासह शहरातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधव तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते